# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर




सर्व भारतीयांना अक्षय तृतीया निमित्त हार्दिक शुभेच्छा !



सर्व हिंदू बांधवांना परशुराम जयंती निमित्त हार्दिक शुभेच्छा !



थोर समाजसुधारक बसवेश्वर महाराज जयंती निमित्त हार्दिक शुभेच्छा !


(वर्ष ६३ वे अंक १२५) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार, दि.१० मे २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


# मोदींकडून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न-राहुल गांधी

नवी दिल्ली दि.९ (वृत्तसंस्था)- काँग्रेस नेते राहुल गांधी सातत्याने बेरोजगारीच्या मुद्द्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भाजप सरकारवर टीका करत आहेत. आता पुन्हा एकदा त्यांनी मोदींना खोचक टोला लगावत देशातील तरूणाईला मोठे आश्वासन दिले आहे. ते म्हणाले की, देशातील युवा ही देशाची शक्ती आहे. नरेंद्र मोदी यांच्या हातून निवडणूक निसटत चालली आहे. ते पुन्हा भारताचे पंतप्रधान बनणार नाहीत. म्हणून त्यांनी निर्णय घेतला असून, काही ना काही करून ध्यान भटकावण्याचा प्रयत्न सुरू आहे. ते काहीतरी नाटक करून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत आहेत. बेरोजगारी हा एक मोठा मुद्दा आहे. ते खोटे बोलत आहेत. भरती भरोसा स्कीमच्या माध्यमातून तरूणांच्या हाताला काम मिळणार आहे.

राहुल गांधींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर व्हिडीओ शेअर करत मोदींवर टीकास्त्र सोडले. त्यांनी कॅप्शनच्या माध्यमातून म्हटले की, ४ जून रोजी इंडिया आघाडीचे सरकार बनत आहे आणि १५ ऑगस्टपर्यंत आम्ही देशातील ३० लाख रिक्त सरकारी पदांच्या भरती प्रक्रियेचे काम सुरू करणार आहोत ही आमची गॅरंटी आहे. नरेंद्र मोदींच्या खोट्या प्रचाराला बळी पडू नका, तुम्ही तुमच्या मुद्द्यांवर ठाम राहा असे ते म्हणाले.



तेलंगणातील एका सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी अदानी-अंबानी या विषयावरून काँग्रेसवर टीका केली होती. याला प्रत्युत्तर देताना राहुल गांधींनी बुधवारी भाजपसह मोदींवर जोरदार प्रहार केला. ते म्हणाले की, मोदीजी थोडे घाबरला आहात काय? तुम्ही बंद खोलीत अदानी-अंबानी यांच्याविषयी चर्चा करायचा. पण, आता प्रथमच जाहीर सभेत अदानी-अंबानी या विषयाला हात घातला. ते टेम्पोमध्ये पैसे देतात हे देखील तुम्हाला माहिती आहे. हा तुमचा वैयक्तिक अनुभव आहे का? एक काम करा सीबीआय आणि ईडीला त्यांच्याकडे पाठवा... सगळी माहिती घ्या. मी पुन्हा एकदा देशाला सांगतो की, जेवढा पैसा मोदींनी अदानी-अंबानी यांना दिला आहे, तितकेच पैसे आम्ही हिंदुस्तानातील गरिबांना देऊ. त्यांनी २२ अरबपती बनवले... महालक्ष्मी योजना, पहिली नोकरी पक्की योजना, या योजनांच्या माध्यमातून आम्ही कोट्यवधींना लखपती बनवू असे ते म्हणाले.

# राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन होणार नाही-शरद पवार

## अदानी आणि अंबानी दोस्तीवरून लक्ष वळविण्यासाठी मोदींची वेगळी चर्चा

सातारा दि.९ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन होणार नाही, असे स्पष्टीकरण गुरुवारी शरद पवार यांनी दिले. पुढील दोन वर्षात अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेससोबत समन्वयाने काम करतील किंवा काँग्रेस पक्षात विलीन होतील, असे भाकीत शरद पवार यांनी एका मुलाखतीत व्यक्त केले होते. त्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार, अशी चर्चा रंगली होती. त्यावर शरद पवार यांनी हे स्पष्टीकरण दिले. ते गुरुवारी साताऱ्यात पत्रकारांशी बोलत होते.



२०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसला एक, राष्ट्रवादी काँग्रेसला ४ आणि एमआयएमला १ अशा ६ जागा विरोधकांना मिळाल्या होत्या. परंतु, या निवडणुकीत आम्हा लोकांची संख्या ३० ते ३५ वर जाईल. लोकांना बदल हवा आहे. लोकांकडून काँग्रेस, राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्त्वाला समर्थन मिळत आहे असे ते म्हणाले.

आतापर्यंत अदानी आणि अंबानी यांची नावे कोणाबरोबर जोडली होती. ते कोणाचे दोस्त आहेत अशी चर्चा सगळीकडे होत असताना त्याची चर्चा पुन्हा पुन्हा होऊ नये व त्याचा परिणाम त्यांच्या पक्षावर होऊ नये, यापासून लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी मोदीं असे बोलत असतात असे शरद पवार यांनी म्हटले.

अदानी आणि अंबानी यांनी काँग्रेसला पैसे दिले अशा पद्धतीची चर्चा मोदींनी केल्याबाबत (पान ४ वर)

# शरद पवारांचा मुलगा असतो तर चांगली संधी मिळाली असती-अजित पवार

शिरुर दि.९ (प्रतिनिधी)- मी शरद पवारांचा मुलगा असतो तर मला चांगली संधी मिळाली असती, मी त्यांचा मुलगा नाही म्हणून मला संधी मिळाली नाही, अशी खंत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी भर सभेत बोलून दाखवली. प्रचाराचे शेवटचे काही दिवस शिल्लक राहिले आहे. त्यात अजित पवार हे शिरुर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार आढळराव पाटील यांच्यासाठी प्रचारसभा घेत आहेत. शिरुर तालुक्यातील सभेत अजित पवारांनी शरद पवारांवर भाष्य केलं आहे. त्यासोबतच शरद पवार आमचं दैवत



असल्याचंदेखील अजित पवार म्हणाले आहेत.

शरद पवार आमचं दैवत आहे. त्याबद्दल दुमत नाही. पण प्रत्येकाचा काळ असतो कुठेतरी ८० वर्षाच्या पुढे गेल्यानंतर नवीन त्यांना संधी द्यायला पाहिजे. मी त्यांचा मुलगा असतो तर मला संधी मिळाली असती, (पान ४ वर)

# एकनाथ शिंदे आणि अजित पवार पहिले अग्निवीर ठरतील पहिल्यांदाच म्हणालो होतो; विजय वडेट्टीवारांची खोचक टीका

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणुकीत आम्हाला ३५ च्या पुढे जागांचा अंदाज आहे, या फेजनंतर आम्ही ४० जागा जिंकणार असं शरद पवार साहेब म्हणतील, असा दावा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. पक्ष विलिनीकरणावरून पवार साहेबांनी जे वर्तविले ते १०० टक्के खरं आहे, राजकारणात सध्या चिखलफेक सुरू झाली असल्याचे ते म्हणाले. चंद्रकांत पाटील यांनी शरद पवारांवर केलेल्या टीकेवरून अजित पवार यांनी चांगलीच खरडपट्टी केली. याबाबत बोलतना विजय वडेट्टीवार म्हणाले की, चंद्रकांत पाटील जे काही बोलले त्यावरून वैयक्तिक राग असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्यासोबत असणं हे देखील दुर्दैव असल्याचे ते म्हणाले.

वडेट्टीवार म्हणाले की, पीएम मोदी झोडपी निवडणुकीसारखे आहेत. हे पहिले पंतप्रधान आहेत, ज्यांना प्रत्येक लोकसभेत जाण्याची वेळ आली आहे यातच त्यांचे अधःपतन दिसते. अजित पवार कुठे आणि कुठल्या विचाराने जाऊन बसले याचा त्यांना



पश्चाताप होणार आहे. मी आधीच गंमतीने म्हणालो होतो की एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे पहिले अग्निविर ठरतील, अशी खोचक टीकाही त्यांनी केली.

त्यांनी पुढे सांगितले की, भाजपची जी नीती आहे ते लोकांचे घर उद्ध्वस्त करून स्वतःचे घर बसवतात, ते वेडापायी कोणत्याही थरावर जातात. राहुल गांधी यांनी उत्तर दिलं आहे. हिंदू, मुस्लिम, भारत पाकिस्तान चाललं नाही. अदानी अंबानी काँग्रेसला मदत करत असेल तर ईडी काय करते? असा सवालही त्यांनी केला. ते म्हणाले की, अमाप फायदा अदानीला कोणी करून दिला? ओएनजीसी कंपनी ९३ हजार कोटींनी तोट्यात जाते, तर अदानीची कंपनी फायद्यात येते, देश लुटण्यासाठी कोणताही कोपरा ठेवला नाही, अशी टीका त्यांनी केली.

# नाती तोडायला नव्हे जोडायला ताकद लागते-सुप्रिया सुळे

पुणे दि.९ (प्रतिनिधी)- मला आता अजित पवारांचा स्वभाव माहित आहे. तुम्हीच तुलना करा ना? कोणाला काय मिळालं याचा हिशोब करा. मला काय मिळालं आणि दादांना काय काय मिळालं. सगळं तुमच्या समोर आहे. सगळं स्पष्ट होईल. त्याचं खूप सोप्प उत्तर मिळेल, असे म्हणत मी त्यांच्या पोटी जन्माला आलो असतो तर या अजित पवारांच्या विधानाला सुप्रिया सुळेंनी प्रत्युत्तर दिले.

शिरुरमधील महाविकास आघडीचे उमेदवार अमोल कोल्हेंच्या प्रचारार्थ सुप्रिया सुळे यांनी प्रचार सभा घेतली. सुप्रिया सुळेंनी अजित पवार यांनी केलेल्या टीकेला सुद्धा जोरदार प्रत्युत्तर दिले.

सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, नाती तोडायला ताकद लागत नाही, नाती जोडायला ताकद लागते. मंत्री पद महत्वाचं की निष्ठा महत्वाची असते. शिरूर लोकसभेचा आपला उमेदवार एक नंबरचा आहे. अमोल दादा माझ्या भावासारखा आहे. आपल्या पक्षावर भ्रष्टाचाराचे आरोप केले जातात, पण आता आपण मुक्त झालो (पान ४ वर)

# अरविंद केजरीवालांच्या जामीन अर्जाला ईडीकडून विरोध

नवी दिल्ली दि.९ (वृत्तसंस्था)- दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीकडून अटक करण्यात आली आहे. ते सध्या तिहार तुरंगात आहेत. मात्र, लोकसभा निवडणुकीदरम्यान प्रचार करण्याची परवानगी मिळावी, अशी मागणी करणारी याचिका त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. उद्या म्हणजे शुक्रवारी १० मे रोजी सर्वोच्च न्यायालय या याचिकेवर निकाल देण्याची शक्यता आहे. मात्र, यापूर्वी ईडीने अरविंद केजरीवाल यांच्या याचिकेला विरोध केला आहे. निवडणूक प्रचार करणे हा मूलभूत अधिकार नसल्याचा युक्तिवाद ईडीकडून करण्यात आला आहे.



एनडीटीव्हीने दिलेल्या वृत्तानुसार, अरविंद केजरीवाल यांच्या याचिकेला विरोध करत ईडीने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. या प्रतिज्ञापत्रात त्यांनी निवडणूक प्रचार हा मूलभूत अधिकार नाही, असे म्हटलं आहे. तसेच केजरीवाल यांच्याकडून निवडणूक प्रचाराच्या नावाखाली तुरुंगांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला जातो आहे, असा दावाही त्यांनी केला आहे. अरविंद केजरीवाल यांना जामीन मिळाल्यास चुकीचा पायंडा पाडला जाईल. यापूर्वी निवडणूक प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीला अंतरिम जामीन मिळालेला नाही, असे ईडीने सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलं आहे.

पुढे या प्रतिज्ञा पत्रात ईडीने असंही म्हटलं आहे, की जर अरविंद केजरीवाल यांना जामीन मिळाला, तर कोणत्याही नेत्याला अटक करणे किंवा कोठडीत ठेवणे कठीण होईल, कारण देशात निवडणुका होत राहतात, गेल्या ५ वर्षात देशात १२३ वेळा निवडणुका झाल्या आहेत.

# सॅम पित्रोदांचे विधान म्हणजे केवळ बकवास-रॉबर्ट वाड्रा

नवी दिल्ली दि.९ (वृत्तसंस्था)- भारताच्या दक्षिणेत राहणारी लोक आफ्रिकन लोकांसारखे तर ईशान्य भारतातील लोक चीनी लोकांप्रमाणे दिसतात, असं विधान काँग्रेसेचे नेते सॅम पित्रोदा यांनी केलं होते. त्यांच्या या विधानानंतर आता विविध स्तरातून प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दरम्यान, आता काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वाड्रा यांचे पती रॉबर्ड वाड्रा यांनीही यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. सॅम पित्रोदा यांचे विधान म्हणजे केवळ बकवास आहे, असे ते म्हणाले. एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.

"तुम्ही गांधी परिवाराशी संबंधित आहात. तुम्ही जबाबदारीने बोललं पाहिजे. ज्यावेळी तुम्ही मोठ्या पदावर असता, तेव्हा तुमच्याकडे जबाबदारीही मोठी असते. कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी विचार करणे आवश्यक आहे. सॅम पित्रोदा यांनी जे विधान केलं आहे, त्याच्याशी मी पूर्णपणे असहमत आहे. त्यांनी केलेलं विधान म्हणजे केवळ बकवास आहे. एखादी सुशिक्षित व्यक्ती अशाप्रकारे विधान कसं करू शकते? याचं मला आश्चर्य वाटतं", अशी प्रतिक्रिया रॉबर्ट वाड्रा यांनी दिली.

# भाजपा सत्तेत आल्यास मुस्लिम आरक्षण रद्द करु-अमित शाह

नवी दिल्ली दि.९ (वृत्तसंस्था)- लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात मुस्लीम आरक्षण हा कळीचा मुद्दा बनला आहे. मुस्लीम आरक्षणावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सातत्याने काँग्रेससह इंडी आघाडीवर टीका करत असतानाच बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालू प्रसाद यादव यांनी सत्तेत आम्ही आल्यास मुस्लिम समाजाला आरक्षण देऊ असं वक्तव्य केलं आहे. अशातच आता केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीदेखील मुस्लिम आरक्षणाबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. तेलंगणाच्या भोनगीर लोकसभा मतदारसंघात



भाजपा उमेदवारासाठी आयोजित प्रचारसभेत बोलताना शाह यांनी दावा केला आहे की, भाजपा सत्तेत आल्यास आम्ही मुस्लिम आरक्षण रद्द करू आणि अनूसुचित जाती, अनूसुचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांचं (ओबीसी) आरक्षण वाढवू.

अमित शाह म्हणाले, काँग्रेस खोटं बोलून, अफवा पसरवून निवडणुका लढू आणि जिंकू पाहत आहे. ते लोक म्हणतात की भाजपा पुन्हा सत्तेवर आली, नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान झाले तर ते आरक्षण संपवून टाकतील. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गेल्या १० वर्षांपासून या देशाचं नेतृत्व करत आहेत. त्यांनी कधी तसा विचारही केला नाही. १० वर्षांत आम्ही आरक्षणाला गालबोटही लावलं नाही. काँग्रेस पक्षाने मात्र मुसलमानांना चार टक्के आरक्षण देऊन अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांचं आरक्षण कमी केले काँग्रेसने एक प्रकारे मागासवर्गीयांच्या आरक्षणावर दरोडा टाकला आहे असे अमित शाह म्हणाले.

# सामूहिक सुट्टी प्रकरणी ३० कर्मचाऱ्यांवर एअर इंडियाची मोठी कारवाई

नवी दिल्ली दि.९ (वृत्तसंस्था)- एअर इंडिया एक्सप्रेसच्या तब्बल ३०० क्रू सदस्यांनी आजारपणाचे कारण पुढे करत सामूहिक सुट्टी घेतल्यामुळे एअर इंडियाची अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली होती. एवढ्या मोठ्या प्रमाणात क्रू सदस्यांनी एकाचवेळी सुट्टी घेतल्यामुळे अनेक उड्डाणे रद्द करण्याची वेळ कंपनीवर आली होती. तसेच काही विमानांचे उड्डाणे पुढे ढकलण्यात आले होते. या गोंधळामुळे प्रवाशांनाही नाहक त्रास सहन करावा लागला. यानंतर आता एअर इंडिया एक्सप्रेसनं मोठं पाऊल उचललं असून ३० कर्मचाऱ्यांना थेट कामावरून काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

सामूहिक सुट्टी घेतलेल्या या कर्मचाऱ्यांनी कंपनीच्या व्यवस्थापनाकडे काही मागण्या मांडल्या होत्या. त्यामध्ये वेतनवाढीसह आदी महत्वाचे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. मात्र, यानंतर अचनाक ३०० कर्मचाऱ्यांनी आजारी असल्याचे कारण सांगत सुट्टी घेतली होती. त्यामुळे विमानतळांवर प्रवाशांना तिष्ठत बसण्याची वेळ आली होती. दरम्यान, सामूहिक सुट्टी घेतलेल्या कर्मचाऱ्यांवर कंपनीच्या दैनंदिन कारभारामध्ये अडथळा आणल्याप्रकरणी नोटीस देण्यात आली आहे. याबरोबरच कंपनीने काही कर्मचाऱ्यांना शेवटचा अल्टिमेटमही दिला आहे. या संदर्भातील वृत्त टाईम्स ऑफ इंडियाने दिले आहे.

# हिंदुत्ववादी संघटनांची नावे घेण्यासाठी माझ्यावर दबाव होता, आरोपी प्रसाद पुरोहितचा जबाब

नवी दिल्ली दि.९ (वृत्तसंस्था)- मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात आरोपी लेफ्टनंट कर्नल (निवृत्त) प्रसाद पुरोहितने एनआयए कोर्टात खळबळजनक माहिती दिली आहे. दहशतवादी कृत्यात सहभाग असल्याचं मान्य करण्यासाठी आपल्यावर दबाव होता, तसंच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद आणि योगी आदित्यनाथ यांच्यावर थेट आरोप करण्यासाठी दबाव टाकला गेला असा दावा प्रसाद पुरोहितने केला आहे.

मुंबईतल्या सत्र न्यायालयातील विशेष एनआयए कोर्टात पुरोहितचा लेखी जबाब सादर करण्यात आला. हा जबाब २३ पानांचा आहे. आपल्यावर राजकीय दबाव असल्याने एटीएसने खोटी केस दाखल केली असा आरोप पुरोहित यांनी आपल्या लेखी जबाबात केला आहे. कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम आणि कम्युनिस्टवादी नेता डॉ. गणपती या दोघांची एक भेट झाली होती. या भेटीची माहिती मिळाल्यानंतर महाराष्ट्रातील नक्षली कारवायांची माहिती भारतीय लष्कराला दिली होती असंही या लेखी जबाबात पुरोहितने म्हटलं आहे.

आरोपी प्रसाद पुरोहितने कलम ३१३ च्या अंतर्गत निवेदन सादर केलं आहे. विशेष न्यायालयात आपले म्हणणे मांडण्यासाठी लेखी निवेदन सादर करण्याचा अधिकार आरोपीला आहे. पुरोहितने म्हटलं आहे की हेमंत करकरे, सिंग आणि तपास अधिकारी मोहन कुलकर्णी यांच्या आदेशाचं पालन इतर सर्व पोलिसांनी केलं. हेमंत करकरे हे २६/११ च्या हल्ल्यात शहीद झाले आहेत. त्यांचंही नाव यामध्ये पुरोहितने घेतलं आहे.

# उद्धव ठाकरेंचे संतुलन बिघडले-फडणवीस

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणुकीच्या पुढील टप्प्यासाठी प्रचाराला जोर आला आहे. तसेच विविध मुद्द्यांवरून महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. एका प्रचारसभेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून बोचरी टीका केली होती. या टीकेला आता देवेंद्र फडणवीस यांनी त्याच शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, (पान ४ वर)

# आमचे अणुबॉम्ब कायम सज्ज असतात

## रशियन राष्ट्राध्यक्ष पुतीन यांची अमेरिकेला खुली धमकी

नवी दिल्ली दि.९ (वृत्तसंस्था)- रशिया पाश्चिमात्य देशांच्या कोणत्याही इशाऱ्याला किंवा हल्ल्याला जशास तसे प्रत्युत्तर देऊ शकते, आमच्याकडचे अणुबॉम्ब नेहमीच सज्ज असतो, असे मोठे विधान राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी केले. रशियाच्या वार्षिक विजय परेडमध्ये बोलताना राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी ब्रिटन आणि अमेरिकेवर जोरदार टीका केली. सध्या रशिया आणि पाश्चिमात्य देश यांच्यात शीतयुद्ध सुरु असून तणाव वाढत चालला आहे. याबाबत बोलताना, पुतिन यांनी रशियाच्या अण्विक सामर्थ्याचा उल्लेख करत इतर बड्या देशांना इशारा दिला. तसेच दुसऱ्या महायुद्धातील ब्रिटनच्या भूमिकेबद्दल पुतीन यांनी जोरदार टीका केली. १९४५ मध्ये दुसऱ्या महायुद्धात जर्मनीच्या पराभव झाला. त्याच्या स्मरणार्थ रशियात ९ मे रोजी एक परेड आयोजित केली जाते. या परेडमध्ये पुतीन यांनी रशियाच्या अणुशक्तीबाबतचा इशारा दिला.

राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी विजय परेडमधील भाषणात अमेरिका, ब्रिटन आणि पाश्चात्य देशांना स्पष्ट इशारा दिला आणि सांगितले की रशिया (पान ४ वर)

# उष्माघात टाळा, स्वस्थ राहा!

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू आहेत. सूर्य जोरात तापू लागला आहे. त्यामुळे उष्णता वाढत आहे. शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी भरपूर पाणी पीत राहणे हा सर्वाधिक चांगला उपाय आहे आणि हा उपाय आपणच करू शकत असल्यामुळे उष्माघात टाळणे आपल्याच हातात आहे. शक्यतो या दिवसांमध्ये आवश्यक असेल तरच घराबाहेर पडले पाहिजे. मात्र त्यासाठी गॉगल, छत्री, टोपी अथवा दुपट्टा आपल्याजवळ असला पाहिजे, तरच डोक्यावर पडणारी तीव्र स्वरूपाची सूर्य किरणे रोखता येतील. मात्र अनेकजण या उपायाकडे दुर्लक्ष करतात, मग नको त्या घटना घडून जातात.

दररोज सूर्य उगवणे, त्याचे तापणे ही नित्यनेमाची नैसर्गिक क्रिया आहे. ती कुणी थांबवू शकत नाही. त्यामुळे सूर्य आपले काम करीत असतो आणि इतरांनाही कामाला लावतो. म्हणजे उन्हामुळे आजारी पडणे. म्हणून या दिवसांत उष्माघात टाळा आणि स्वस्थ राहा हाच संदेश सगळ्यांसाठी महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रात विशेषकरून विदर्भात राज्याच्या इतर भागापेक्षा अधिक तापमान असते. खासकरून नागपूर, चंद्रपूर, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ या जिल्ह्यांत उन्हाची तीव्रता जास्त जाणवते. त्याचे भौगोलिक कारण सांगितले जाते की, या पट्ट्यातून कर्कवृत्त गेल्याचे. कर्क रास सर्वांना माहिती आहे. कर्क म्हणजे कॅन्सर. कॅन्सर किती जीवघेणा आहे, हे वेगळे सांगायला नको. कॅन्सरचे नाव जरी आपण काढले तरी भीती वाटते. तसे हे कर्कवृत्त असावे, अशी कल्पना येते. सध्या विदर्भाच्या काही भागांत एप्रिलच्या मध्यावरच तीव्र स्वरूपाचे ऊन जाणवत आहे. दोन दिवसांपूर्वी चंद्रपूर जिल्ह्यात ४४ अंशांपेक्षा अधिक तापमान होते. वाशिम, अमरावती या जिल्ह्यांत त्या खालोखाल तापमान होते. एप्रिल आणि मे हे दोन महिने कडक उन्हाचे समजले जातात. या दोन महिन्यांच्या काळात प्रत्येकाने उन्हापासून संरक्षण करण्यासाठी खबरदारी घेतली पाहिजे. मला काय होते? असे आई – वडील अथवा मोठ्यांनी सांगितल्यावर मुले तसे म्हणतात. पण त्यांचा सल्ला योग्य असतो. नेमके अनेकजण त्याकडे दुर्लक्ष करतात. मुंबईतही उन्हाची तीव्रता सध्या जाणवत आहे. ४० अंशांचा टप्पा उन्हाने ओलांडला असल्यामुळे मुंबईकर त्रस्त झाले आहेत. मुंबईत नेहमीच दमट तापमान असते. त्यामुळे सतत शरीरातून घाम निघत असतो. उन्हामुळे तर सध्या सर्वचजण त्रस्त आहेत. सूर्य देव कोपला, आग ओतू लागला, जीवाची लाही लाही करू लागला असेही आपण म्हणतोच. उष्माघात कसा होतो, मृत्यू होण्यासाठी उष्माघात कसा जबाबदार ठरू शकतो, यावर उपाययोजना काय करावी या संदर्भात तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले आहे. उष्माघाताचा त्रास साधारणपणे दोन प्रकारचा असतो. बाहेरील तापमान वाढल्याने परिश्रम नसलेला, यामुळे उष्माघात होतो. तर बाहेरील तापमान फार वाढलेले नसते; परंतु शरीरातील तापमान वाढल्याने परिश्रमात्मक उष्माघाताचा त्रास होतो. बाहेरील तापमान वाढल्यावर शरीरातील तापमान नियंत्रित करण्यासाठी शरीरात असलेली कुलिंग यंत्रणा कार्यान्वित होते. ही यंत्रणा शरीरातील घाम बाहेर टाकून शरीराचे तापमान नियंत्रित ठेवते. यावेळी शरीराला पाण्याची आवश्यकता भासत असते. मात्र हे पाणी न मिळाल्यास शरीरातील घाम बाहेर टाकण्याची प्रक्रिया थांबते आणि शरीरातील तापमान ४० अंश होते. अशा वेळी शरीराचे तापमान नियंत्रित करणारी ही यंत्रणा ठप्प होते. परिणामी श्वसनाचा त्रास सुरू होतो, रक्तदाब कमी होतो, उलटी व चक्कर येण्यास सुरुवात होते. व्यक्तीला अस्वस्थ किंवा चक्कर येऊन तो खाली पडतो. तसेच शरीरातील मेंदू, मूत्रपिंड, हृदय असे अवयव बाधित होण्यास सुरुवात होते, तर परिश्रमात्मक उष्माघातामध्ये व्यक्ती दूरचा प्रवास करीत असल्यास किंवा व्यायाम करीत असेल, तर उष्माघाताचा त्रास होतो, अशी माहिती इंडियन सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिनचे मुंबई शाखेचे सचिव डॉ. भारत जागीयासी हे देतात.

सगळेजण या ना त्या कारणाने उन्हात फिरत असतात. पण काही जणांचाच उन्हात गेल्यामुळे मृत्यू होतो. आपल्या शरीराचे तापमान ३७ अंश से. असते. या तापमानातच शरीरातील सर्व अवयव नीट काम करतात. घामाच्या रूपाने पाणी बाहेर काढून शरीर ३७ अंश से. तापमान कायम राखण्यात येते. सतत घाम निघत असताना पाणी पीत राहणे अत्यंत गरजेचे आहे. पाणी शरीरात इतरही महत्त्वाची कामे करत असते. त्यामुळे पाण्याचा साठा कमी झाला तर शरीर घामाच्या रूपाने पाणी बाहेर टाकण्याचे टाळते. जेव्हा बाहेरचे तापमान ४५ अंशांचा पुढे जाते आणि शरीराची कुलिंग व्यवस्था पाण्याच्या अभावाने ठप्प होते, तेव्हा शरीरात तापमान ३७ अंशांच्या पुढे जाऊ लागते. शरीराचे तापमान जेव्हा ४२ अंश डिग्री सेल्सअसपर्यंत पोहोचते तेव्हा त्या वक्तीला रक्तदाब कमी होणे, चक्कर येणे, उलट्या होणे, निर्जलीकरण होणे अशा त्रासाला सामोरे जावे लागते. तसेच व्यक्तीचे अवयव हळूहळू बंद पडतात आणि त्याचा मृत्यू ओढवतो, याकडे जे. जे. रुग्णालयातील डॉ. मधुकर गायकवाड यांनी लक्ष वेधले आहे. एकूणच उष्माघात जीवघेणा कसा ठरतो, यांची कल्पना येऊ शकते. म्हणून उष्माघात येऊच नये अथवा होऊच नये यासाठी खबरदारी घेणे आवश्यक असून काही त्यासाठी असलेल्या उपाययोजनांचाही अवलंब केला पाहिजे. जसे भरपूर पाणी प्या, सैल आणि सुती कपडे वापरा, गॉगलचा वापर करा, डोक्यावर टोपी अथवा दुपट्टा वापरा, उन्हात जाणे टाळा, कष्टाची कामे उन्हात करू नका, शिळे आणि खूप प्रथिनयुक्त अन्नपदार्थ खाऊ नका आदी उपायांचा अवलंब केला, तर उष्माघातापासून निश्चितच जपता येईल आणि आपण स्वस्थ जीवनही जगू शकू, हे ध्यानात घेतले पाहिजे. उन्हाळ्याच्या दिवसांत आपल्या शहरातील महानगरपालिका, नगर परिषदा, ग्रामपंचायत, स्थानिक रुग्णालये आणि वैयक्तिक स्वरूपात आपले डॉक्टरही काळजी घेण्याचे आवाहन करीत असतात ते उगाच नव्हे!

# अक्षय तृतीया : विष्णू पार्वतीचे स्वामित्व असलेली तिथी

**हा** एक शुभ दिवस मानतात. एखाद्या नवीन कामाला आरंभ करावाचा झाल्यास यादिवशी करतात. दरवर्षी वैशाख शुक्ल पक्षातील तृतीया ही अक्षय तृतीया म्हणून प्रसिद्ध आहे. हा दिवस सर्व कामाला शुभ मानला आहे. कारण या दिवशी केलेल्या कार्याचे शुभ फल मिळते. विष्णू पार्वतीचे स्वामित्व असलेली ही तिथी आहे. या दिवशी केलेल्या देवपूजेमुळे घराण्यातील अनेक दोष नष्ट होतात. माणसाच्या हातून रोज अनेक चुका होत असतात. शुभ कार्य घडले, परीक्षेत यश मिळाले, लग्न झाले, पैसा मिळाला, सफल समारंभ झाले, एखाद्याला आशीर्वाद दिला अशा घटना घडल्यावर आपली पूर्ण पुण्याई कमी होत असते.

जोपर्यत पूर्वपुण्याई शिल्लक असते तोपर्यंत काही त्रास होत नाही, पण त्यानंतर त्रासाचे दिवस सुरू होतात. हाती घेतलेली कामे होत नाहीत. आरोग्य वारंवार बिघडू लागते. आर्थिक अडचणी सुरू होतात. निष्कारण गैरसमज निर्माण होतात. भांडणतंटे सुरू होतात. व्यसने जडतात, घरातील वातावरण बिघडते. यासाठी पुण्याईचा साठा वाढविणे ही काळाची गरज आहे. कुणाचे प्रारब्ध कसे असेल त्यानुसार पुण्य कमी जास्त होत असते. विनाशकाली विपरीत बुध्दी असं म्हणतात. आपला विनाशकाळ जवळ आला म्हणजे माणसाची बुध्दी बिघडते. हे कलियुग असल्याने कुणी कुणाचा मान ठेवत नाहीत. माणसाचा कल देवधर्माकडे नसतो. पुण्याई शिल्लक असेर्पत परिणाम दिसून येत नाहीत. नंतर मात्र दुष्कर्माचे चटके बसू लागतात.

पुण्याईचा साठा वाढण्यासाठी अक्षय तृतीयेचे पूजन सांगितले आहे. शक्यतो कुलदेवतेची पूजा करावी. कुलदैवत माहिती नसल्यास कुठल्याही देवाची पूजा करून कुलदैवतौ नम: असे म्हणावे. या दिवशी जलदानाचे महत्त्व सांगितले आहे.

जलदान, वृक्षसंवर्धन आणि मुक्या प्राण्यांना जीवनदान दिल्यास अनेक दोष नष्ट होतात.अक्षय ततीयेला केलेली पूजा ही घराणतील अनेक दोष नष्ट करून कुटुंबाचा उध्दार करते. शक्य असेल तर या दिवशी पाणपोया सुरू कराव्यात. पशुपक्ष्यांसाठी पाण्याची सोय करावी. झाडे जगवा झाडे वाचवा हे तत्त्व धनात ठेवावे.



## अक्षय तृतीयेच्या दिवशी काय करावे

- व्रताच्या दिवशी ब्रह्म मुहूर्तावर उठावे
- या दिवशी आपल्या जवळच्या नदीत किंवा जमल्यास गंगेत वा समुद्रात अंघोळ करावी.
- सकाळी पंखा, तांदूळ, मीठ, तूप, साखर, चिंच, फळ आणि वस्त्राचे दान द्यावे.
- ब्राह्मण भोजन घालावे. या दिवशी सातूचे महत्त्व असून ते जरूर खायला हवे.
- या दिवशी नवीन वस्त्र, शस्त्र, दागिने विकत घ्यावे.
- घरातच एखाद्या पवित्र जागेवर विष्णूची प्रतिमा किंवा चित्र स्थापित करावे.
- संकल्प करून भगवान विष्णूला पंचामृताने अंघोळ घालावी.
- षोडशोपचार विधीद्वारे विष्णूची पूजा करावी.
- भगवान विष्णूला सुगंधित फुलांची माळ घालावी.
- नवैद्यात जवस किंवा गव्हाचे सातू, काकडी आणि हरबऱ्याची डाळ द्यावी.
- जमत असेल तर विष्णू सहस्रनामाचा जप करावा.
- शेवटी तुळशीला पाणी देऊन भक्तिभावाने आरती करावी.
- साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने या दिवशी नवीन घरात प्रवेश, नवीन वस्तू घेणे, मोठे आर्थिक व्यवहार करणे आदी शुभ कामेही केली जातात.

**खाली दिलेल्या मंत्राने संकल्प करावा**

**ममाखिलपापक्षयपूर्वक सकल शुभ फल प्राप्तये**
**भगवत्प्रीतिकामनया देवत्रयपूजनमहं करिष्ये।**

- जो मनुष्य या दिवशी गंगा स्नान करेल, तो पापांतून मुक्त होतो.
- या दिवशी परशुरामाची पूजा करून त्यांना अर्घ्य दिले जाते.
- शुभ कार्ये या दिवशी होतात.
- नित्य कर्म करून शुद्ध पाण्याने आंघोळ करावी.
- श्रीकृष्णाने युधीष्ठिराला असे सांगितले होते, की 'या तिथीस केलेले दान व हवन क्षयाला जात नाही, म्हणून हिला अक्षयतृतीया असे म्हटले आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय (अविनाशी) होते.

## शास्त्रांमध्ये अक्षय तृतीया

- या दिवसापासून सत्ययुग आणि त्रेतायुगाचा प्रारंभ झाला होता असे काहींचे मत आहे.
- या दिवशी श्री बद्रीनारायणाचे द्वार उघडतात.
- नर-नारायणाने या दिवशी अवतार घेतला होता.
- श्री परशुरामाचे अवतरणसुद्धा याच दिवशी झाले होते.
- वृंदावनाच्या श्री बांकेबिहारीच्या मंदिरात फक्त याच दिवशी श्रीविग्रहाचे चरणदर्शन होतात आणि बाकी पूर्ण वर्ष ते वस्त्रांनी झाकलेले असतात.

**अक्षय तृतीया हा सण वैशाख शुद्ध तृतीयेला साजरा केला जातो. हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहे. या दिवशी दान, होम, जप व पितरांचे तर्पण करतात. या दिवशी आपणांस अत्यंत प्रिय असेल ते दान करावे. गौरी उत्सवाची या दिवशी सांगता होते.**

# जहांगीर कला दालनात मल्लिकार्जुन सिंदगी यांचे 'होरायझन'

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्य कलाध्यापक महासंघाचे अध्यक्ष राहीलेले ज्येष्ठ चित्रकार मल्लिकार्जुन सिंदगी यांचे 'होरायझन' प्रदर्शन दि.१४ ते २०मे च्या दरम्यान जहांगीर कला दालनात सुरू आहे. या प्रदर्शनात त्यांच्या कलाकृती पाहतांनाच त्यांच्या कला प्रवासाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी सरांचा परिचय फार मोठा आहे. त्यांच्या परिचयाचा सारांश रूपाने परिचय करून देत त्यांच्या कलाकृतींचा परिचय रसग्रहण स्वरूपात करणे जास्त रास्त राहिल.

घरामध्ये कोणत्याही प्रकाराचा कलेचा वारसा नसलेल्या परिस्थिती मधून चित्रकार मल्लिकार्जून सिंदगी यांनी कलेचे शास्त्रीय पद्धतीने शिक्षण टप्याटप्याने पूर्ण करून , प्रपंच भागवण्यासाठी अंदाजे ३७ ते३८ वर्षापूर्वी कलाशिक्षकाची सेवा स्विकारून ते मुख्याध्यापक पदावरून सेवा निवृत्त झालेले आहेत. कलाशिक्षक मुख्याध्यापक पदी निवड होणारे चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी हे मोजक्या कलाशिक्षकां पैकी ओळखले जातात. चित्रकार मल्लिकार्जून सिंदगी यांनी कलाशिक्षक ते मुख्याध्यापक पद या कार्यकाळात , कलाशिक्षक संघटनेचे संघटन करण्याचे कार्य अतिशय कौशल्याने व कुशलतेने सांभाळलेले आहे. चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी यांना अनेक मानसन्मान मिळालेले असून महाराष्ट्र राज्य शासनाने, त्यांना 'आदर्श कला शिक्षक ' पुरस्कार प्रदान करुन गौरविलेले आहे.

चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी , हे कलेविषयी अनेक प्रकाराचे साहित्य लिखाण सातत्याने करत असतात . त्यांचे कला विषयक लेखन ,हे कांही पुस्तकांच्या रुपांने अनेकांच्या संग्रही आहे. चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी सरांनी कलाशिक्षक प्रशिक्षण विभागातील ए.टी.डी. वर्गासाठी पुनर्रचित अभ्यासक्रमां मध्ये ' भाषाअध्यापन शास्त्र ' या विषयांवरील शास्त्र शुद्ध पद्धतीने , मुद्देसुद सविस्तर पुस्तक लिहून ते प्रकाशित केले आहे आणि ते प्रशिक्षित विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवले आहे.

चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी हे मुळातच बहुभाषिक आहेत,१४भाषांचे ते जाणकार असूनही त्यांची बोलीभाषा ही प्राधान्यक्रमाने मराठी त्यामुळे त्यांची राहाणीमान व जीवनशैलीचा प्रभाव त्यांच्या चित्र निर्मीतीतून दिसून येतो आहे. चित्रकार श्री. मलिकार्जून सिंदगी हे कोरोना काळात कोरोना बाधीत झाले होते. कोरोना माहामारीच्या कालावधीत ते बाधीत होवून ते एकलकोंडेपणा असहय जीवण जगत होते . मरण त्यांच्या नजरेसमोर तरळत होते. अशा परिस्थितीमध्ये काय करावे? या विवंचनेतून त्यांनी आपल्या मनांतील भावना जागृत केल्या आणि कलासाधना हेच माझ्या जीवनाचे एकमेव ध्येय हे प्रमाण मानून त्यांनी त्यावेळी कलासाधनेला सुरुवात केली आणि संबंध कोरोना कालावधीत कलेची साधना केली ती कला साधना त्यांच्या फळरूपाला आली. 'कला जीवनाचे सार' अशा आशयाचे त्यांनी पुस्तक प्रकाशित केले आहे. कला माणसाला जीवन जगण्याची उमेद देते असे चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी सर्वांना आर्वजून सांगतात किंबहुना हा सामाजिक संदेश देतात. चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी हे कलाकृती / चित्र निर्मिती करतांना फारसा विचार न करता प्रथम उपलब्ध पृष्ठभागावर उपलब्ध माध्यमाद्वारे सहजपणे छेडछाड करतात आणि मग खऱ्या अर्थाने त्यांची कलाकृती निर्माण होण्यास सुरुवात होते.

कलाकारांना आपली कला साकारण्यासाठी कोणत्या न कोणत्या प्रकाराचा आकार हवा असतो , तो मूर्त असो कि अमूर्त स्वरूपाचा. चित्रकार मल्लिकार्जून सिंदगी यांनी साधे- साधे कागदापासून ते कॅनव्हासपर्यंत कलाकृती साकारण्यासाठी अनेक प्रकाराचे पृष्ठभाग छोट्या मोठ्या , कमी अधिक प्रमाणात




वापरले आहेत किंबहुना ते हाताळलेले आहेत. चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी चारकोल/ कोळश्या सारख्या पारंपारिक माध्यमापासून ते विविध रंगी पेन ,रंगीत पेंन्सिल्स, रंगखडू , ऑक्रॅलिक , तैलमाध्यम अशा अनेक प्रकाराच्या अधुनिक माध्यामाचा वापर खुबीने करतात . मुख्यत्वेकरून प्रदर्शनामध्ये कॅनव्हॉस व ऑक्रॅलिक व तैल माध्यमातील कांही निवडकच मोजक्या कलाकृती प्रदर्शित करण्यात आलेल्या आहेत . इतर माध्यमात केलेल्या कलाकृती काही शेकडोच्या संख्येने त्यांच्याकडे संग्रही आहेत. चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी हे पृष्ठभागावर सहजपणे चित्र निर्मितीला सुरुवात करतांना माध्यमांशी छेडछाड करतात मग त्यांना पृष्ठभागात/ अवकाशात एखादा छोटा-मोठा बिंदू दिसतो तर कधी-कधी रेषांचे वेगवेगळे प्रकार दिसतात आणि मग चित्रकार श्री. मलिलकार्जून सिंदगी सर चित्ररूप साकारण्या कडे सरसावतात . कलेच्या मुलतत्वामधले एखादे मुलतत्व चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी यांच्या दृष्टिक्षेपात आला की मग मूर्त स्वरूपात असो की अमूर्त स्वरूपात असो कलाकृती निर्माण करण्यासाठी आपल्या कला कौशल्याचा परिपूर्ण वापर करतात.

एखाद्या बिंदूला किंवा रेषांच्या प्रकाराला मूर्त- अमूर्त रूप देत देत कलाकृती मध्ये मुलभूत भौमितिक आकारांची निर्मिती तर नैसर्गिक आकारांत नदी, नाले , सुर्य, डोंगर , झाडा झुडूपांचे विविध डौलदार आकार , आकाशामधील विविध प्रकारच्या आकाराची निर्मिती , अथांग समुद्र किनारे , खवळलेल्या पाण्याच्या लाटा , जहाज, बोटी , सुर्य किरणे इत्यादी अनेक प्रकाराचे मूर्त - अर्मूत स्वरूपाचे आकाराचे विषय चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी यांच्या कलाकृतीमधून दिसून येतात .

विशेष म्हणजे चित्रकार मल्लिकार्जून सिंदगी सरांच्या कलाकृती मध्ये ध्वज, शिव पार्वती , नंदी बैल , शंख- डमरू , त्रिशूल , शंकराची पिंड , होम-हवन , ज्वाला इत्यादी पारंपारिक व दैवीय आकार मूर्त - अमूर्त स्वरूपात दिसून येतात. चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी हे, आपल्या कला निर्मितीमध्ये उजेड अंधार , उन सावल्यांचा खेळ अतिशय कौशल्यपूर्ण विविध प्रकारच्या रंगसंगती माध्यमातून साकारण्यामध्ये कमालीचे यशस्वी झालेले आहेत.

चित्रकार श्री. मल्लिकार्जुन सिंदगी यांनी कलाकृती / रंगलेपन कधी कधी समरंग पटलाद्वारे तर कधी कधी श्रेणीक्रमाने तर कधी कधी आच्छादित पद्धतीने तर कधी- कधी तुटक पद्धतीने तर कधी कधी मिश्रित पद्धतीने रंगलेपन करून अतिशय सुंदर मनमोहक कलाकृती साकारलेल्या आहेत . चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी यांनी रंगलेपनामध्ये पांढरा रंग, काळा रंग, कृष्ण धवल रंग, पिवळा हिरा, फिक्कट निळा , गडद निळा , पिवळा, तांबडा, नारंगी आश्या उष्ण व शीत रंगाचा वापर त्यांच्या चित्राकृतींमध्ये चपखलपणे केलेला आहे . त्यामुळे चित्र पहातांना चित्रामध्ये जवळचे -लांबचे अंतर दिसून येते. चित्रामध्ये धुसर पणा जाणवतो आहे तर कांही चित्रांमध्ये धुरकटपणा , धुर निघणारे , वातावरणात जाळ धगधगत आहे , आभाळ भरून आलेलं आहे , कडक उन पडले आहे , सकाळ सकाळीचे पहाटेचे दृश्य चित्र निर्माण करण्यामध्ये चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी हे कुंचल्याच्या माध्यमातून रंगलेपन करून चित्र निर्मितीला , चित्र विषयाला , चित्र वातावरणाला , चित्रमाध्यमाला खऱ्या अर्थाने न्याय मिळवून देण्यासाठी कमालीचे यशस्वी झालेले आहेत. विशेषतः भडक रंगाचे आयोजन हे अनेक चित्रकृतीचे वैशिष्ट्ये वाटते. कुंचला, नाईफ , रोलर इत्यादी अनेक प्रकाराच्या माध्यमांचा वापर करण्यास चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी महत्व देतात. अशा विविध मुलतत्वांचा कौशल्यपूर्ण उपयोग करून तयार केलेल्या कलाकृती रसिकांच्या मनामनामध्ये सौंदर्य भाव निर्माण करतीलच या बद्दल शंका नाही.

दि. १४ में ते २० मे २०२४ या कालावधीत जहांगीर आर्ट गॅलरी, काला घोडा, मुंबई येथे होत असलेल्या चित्रकार श्री. मल्लिकार्जून सिंदगी यांच्या एकल चित्र प्रदर्शनास कला रसिकांनी, कला प्रेमींनी, आणि कला संग्राहकांनी आवर्जून भेट द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

**– रवींद्र मालुसरे**
अध्यक्ष, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई ९३२३११७७०४

# परशुरामांच्या जन्मोत्सवानिमित्त पृथ्वीला व निसर्गाला वाचविण्याकरीता व्हावे वृक्षारोपण



**परशुरामाचा** जन्म वैशाख शुद्ध तृतीया (अक्षय तृतीया) म्हणजेच साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभ मुहूर्ताच्या दिवशी जमदग्नी व रेणुकामाता यांच्या पोटी झाला.परशुराम हे भगवान विष्णूचे सहावे अवतार मानले जाते व हा अवतार चिरंजीव आहे.परशुराम महादेवाचे परम भक्त होते.भगवान महादेवाने परशु अस्त्र त्यांना प्रदान केल्यामुळे त्यांना परशुराम या नावाने ओळखले जाऊ लागले. परशुरामाचा जन्म महाभारतानुसार त्रेतायुग व व्दापर युगाच्या संधीकाळात झाला.परशुरामाने दृष्ट व दुर्जन अशा क्षत्रिय राजांचा संहार केला.उन्मत्त झालेल्या क्षत्रियांचा नाश करून युद्ध संपल्यावर महेंद्र पर्वतावर जात असे.क्षत्रियांनी पुन्हा उत्पात केला की त्यांचा नाश करायचे.अशा २१ मोहीमा केल्यावर शेवटचे युद्ध करून त्यांनी रक्ताने माखलेला परशू धुतला व शस्त्र खाली ठेवले. यानंतर परशुरामाने क्षत्रियांशी वैरभाव सोडला आणि ब्राह्मण, क्षत्रिय या सर्वांना समानतेने अस्त्र-शस्त्र विद्या शिकवायला सुरुवात केली.महाभारतात भीष्माचार्य, कर्ण, द्रोणाचार्य इत्यादी थोर योद्धे परशुरामाचे शिष्य होते.भीष्माला त्यांनी आपल्या सगळ्या विद्या प्रदान केल्या.परशुराम यांचा उल्लेख रामायणात सीता स्वयंवरात देखील येतो.परशुरामाने आपले तेजस्वी धनुष्य रामाला देवुन आपले क्षात्रतेज रामात संक्रमित केले.

परशुरामाच्या क्षत्रीय वधाच्या मोहीमामुळे संपूर्ण पृथ्वीवर त्यांचे प्रभुत्व आले.त्यामुळेच त्यांना अश्वमेध यज्ञाचा अधिकार प्राप्त झाला व त्यांनी अश्वमेध यज्ञ केला.यज्ञाच्या शेवटी या यज्ञाचा अध्वर्यू कश्यप याला परशुरामाने सर्व भूमी दान केली.जोपर्यंत परशुराम या भूमिती आहे तोपर्यंत क्षत्रिय कुळांचा उत्कर्ष होणार नाही, हे जाणून कश्यपने परशुरामाला सांगितले की आता या भूमीत माझा अधिकार आहे.तुला इथे रहाण्याचा अधिकार नाही. कश्यपच्या वक्तव्या नंतर परशुराम यांनी समुद्र हटवून स्वतःचे क्षेत्र निर्माण केले. वैतरणा ते कन्याकुमारीपर्यंत असलेल्या या भूभागाला 'परशुरामक्षेत्र' ही संज्ञा दिली आहे.परशुराम यांनी २१ वेळा पृथ्वी प्रदक्षिणा करतांना १०८ शक्तीपीठ व तीर्थक्षेत्रांची स्थाने प्रस्थापित केली.म्हणजेच क्षेत्र पालदेवतांची स्थाने स्थापन केली.महाभारतात अंबेच्या याचनेवरून परशुराम आणि भीष्माचार्य यांच्यात घनघोर युद्ध झाले हे युद्ध तब्बल २१ दिवस सुरू होते.

ऋषी-मुनींनी एकत्रितपणे परशुरामाला भिष्माची प्रतिज्ञा आणि समस्या याबद्दल अवगत केले.यानंतर परशुरामाने युद्ध थांबविले.मात्र भीष्म प्रतिज्ञेमुळे गंगापुत्र देवव्रतांनी अंबेशी विवाह करण्यास नकार दिला.परशुरामानी स्वतःच्या वास्तव्यासाठी सह्याद्री पर्वतावरून शरसंधान करून अरबी समुद्रास मागे हटविले व तीथेच कोकणभूमी वसविली. परशुरामाचे वास्तव्य कर्नाटकातील गोकर्ण क्षेत्री असल्याचे मानले जाते.

त्रेता युगात व व्दापर युगात भगवान परशुराम यांचे वास्तव्य जंगल व दऱ्याखोऱ्यात असायचे.परंतु सध्या आपण कलयुगात आहोत या कलयुगात मानवाने वृक्षांची कत्तल करून निसर्गावर घोर अन्याय करून निसर्गाची राखरांगोळी केली आहे त्यामुळे पृथ्वीसह संपूर्ण निसर्ग व जीवसृष्टी भयभीत आहे.याकरीता निसर्ग वाचविण्याची जबाबदारी आज पृथ्वीतलावरील संपूर्ण मानव जातीची आहे. भगवान परशुराम जन्मोत्सवाचे औचित्य साधून भारतातील प्रत्येक व्यक्तीने आजच्या दिवशीला वृक्षारोपण केले पाहिजे.कारण १० मे अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे या दिवशी भगवान परशुरामाचा जन्म, अक्षयतृतीया, आणि १० मे जागतिक पृथ्वी दिवस सुध्दा आहे.

या महत्वपूर्ण दिवसाचे औचित्य साधून मानवजातीच्या कल्याणासाठी संपूर्ण मानव जातीने पृथ्वीचे संगोपन करण्यासाठी वृक्षारोपण केले पाहिजे.यामुळे गुरांना चारा पशु-पक्षांना सावली व मानवाला शुद्ध हवा मिळण्यास मोठी मदत होईल व संपूर्ण निसर्ग प्रफुल्लित राहिल.यातच आपल्याला भगवान परशुरामाचे खरे दर्शन होईल कारण भगवान परशुराम चिरंजीवी आहेत. भगवान परशुरामाच्या जन्मोत्सवा निमित्त कोटी कोटी प्रणाम.हर हर महादेव!

**– रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)

# आज अक्षय तृतीया

**भारतीय** परंपरेत प्रत्येक सण साजरे करण्यामागे कृतज्ञता, शास्त्रीय कारण मीमांसा दडलेली आहे. पण या बाबीचा उहापोह न झाल्यामुळे कोणता उत्सव का साजरा करायचा हे माहीत नसते. आता अक्षय्य तृतीया श्रीविष्णूसहित वैभवलक्ष्मीच्या प्रतिमेचे पूजन, कृतज्ञताभाव जपण्यासाठी मृतिकेची पूजा या अनेक कारणांकरिता हा दिवस साजरा करायला सांगितले आहे. या दिवसाला सोनेरी दिवस, साडेतीन मूहूर्तांतील दिवस म्हटल्यामुळे दिवसाचे महत्त्व वाढते आणि काही गोष्टी सांगड घालून दिल्याने हा दिवस साजरा होतो. परंपरेप्रमाणे साजरा होत राहणारच.

अक्षय्य तृतीयेला हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे. शास्त्रीय परंपरेनुसार गुढी पाडवा, अक्षय्य तृतीया आणि दसरा असे तीन दिवस व कार्तिक दसरा असे तीन दिवस व कार्तिक शुद्ध प्रतिपदा हा अर्धा दिवस, असे मिळून साडेतीन मुहूर्त होतात. हा मुहूर्ताचा पूर्ण दिवस शुभ मानला जातो. त्यामुळे मोठी खरेदी किंवा एखाद्या चांगल्या कामाची सुरूवात या दिवशी होते.

हा दिवस कोकण आणि गोवा भागात परशुराम जयंती म्हणूनही साजरा होतो. परशुराम हा विष्णूचा सहावा अवतार मानला जातो. जगातील ब्राम्हणांचा रक्षणकर्मा, असा त्यांचा नावलौकिक आहे. त्यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो. वैशाख शुद्ध तृतीयेला अक्षय्य तृतीया हे नाव पडण्यामागे पुराणात काही संदर्भ आढळतात. त्रेतायुगाची सुरूवात याच दिवशी झाली, असे मानले जाते. ज्या दिवशी एका युगाचा अंत होवून दुसऱ्या युगाला सुरूवात होते. त्या दिवसाला हिंदू धर्म शास्त्रात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दिवसाने एका कलहकालाचा अंत व दुसऱ्या युगाच्या सत्ययुगाची सुरूवात, अशी संधी साधलेली असल्यामुळे त्या संपूर्ण दिवसाला मुहूर्त म्हणतात.

'अक्षय' या शब्दाचा अर्थ दीर्घायुषी, कधीही कमी न होणारा कायम राहणारा म्हणून अक्षय. ज्याचा क्षय होत नाही असा त्यामुळे नव्या गोष्टीची खरेदी, व्यवसायाची सुरूवात किंवा महत्त्वाचे कार्य या दिवशी केले जाते. महत्त्वाच्या कार्याबरोबरच याच दिवशी दान, हवन, पूजा, तर्पण आदी पुण्यकर्मही याच दिवशी केले जातात. हा दिवस पितरांचे ऋण फेडण्याचा दिवस म्हणूनही ओळखला जातो. सदोदित कृपादृष्टी ठेवणाऱ्या मृतिकेमुळेच आपल्याला धान्यलक्ष्मी, धनलक्ष्मी व वैभव लक्ष्मी यांची प्राप्ती होते. अक्षय्य तृतीया हा दिवस. म्हणजे कृतज्ञ भाव ठेवून मृतिकेची उपासना करण्याचा दिवस शेतकरी वर्ग या शुभ मुहूर्तावर आळी करून पेरणी करण्यास सुरूवात करतात तर आयुर्वेदात या दिवशी रोपांची लागवड केल्यास औषधी वनस्पतींचा तुटवडा भासत नाही. असे मानतात. अशा या अक्षय मुहूर्ताचे महत्त्व जाणून अक्षय्य तृतीयेचा उत्सव साजरा करूयात.

# आरबीआयची नवी नियमावली; कर्ज वाटपासंदर्भात कडक सूचना जाहीर!

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी) - नवे आर्थिक वर्ष सुरु होताच अनेक बँकांनी नवी नियमावली जाहीर केली होती. भारतीय रिझर्व्ह बँकेत (आरबीआय) सातत्याने नवे नियम होत असताना आता आरबीआयने कर्जाच्या मर्यादेबाबत एक नवीन अलर्ट जारी केला आहे. यामध्ये आरबीआयने नॉन-फायनान्शियल बँकिंग कंपन्यांना म्हणजे ँइण संस्थांना रोख कर्ज मर्यादेबाबतचे काही नियम पाळण्यास सांगितले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरबीआय आता आयकर कायद्यातील हा नियम आणखी कठोर करण्याच्या दिशेने पावले उचलत आहे. NBFC कंपन्यांना धोका पत्करावा लागू नये तसेच नियमांकडे दुर्लक्ष केले जाऊ नये यासाठी आरबीआयने ही कठीण पाऊले घेतली आहेत. त्याचबरोबर छ्इ्थ फायनान्स या एनबीएफसी कंपनीवर अनेक नियमांचे उल्लंघन केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर आरबीआयने नवीन सूचना जारी केल्या आहेत.

**कॅश लोनवर आरबीआयची मर्यादा -** आरबीआयने नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्यांना पत्र लिहित, नियमानुसार २०,००० रुपयांपेक्षा जास्त रोख कर्ज कोणत्याही ग्राहकाला देता येणार नाही अशी माहिती दिली आहे. अशा परिस्थितीत, कोणत्याही NBFC ने कर्जाची रक्कम २०,००० रुपयांपेक्षा जास्त रोख न देण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

**IIFL फायनान्सवर कारवाई**

**आरबीआयची नवी नियमावली; कर्ज वाटपासंदर्भात कडक सूचना जाहीर!**

गोल्ड लोन ऑपरेशन्स IIFL फायनान्सच्या व्यवसायात महत्त्वपूर्ण योगदान देते. मात्र व्यवस्थापनातील मोठ्या त्रुटींमुळे नव्या ग्राहकांसाठी त्यांचे सोने कर्ज ऑपरेशन त्वरित थांबवण्याचे आदेश केंद्रीय बँकेने ☒☒☒☒☒फायनान्सला दिले होते.

या फायनान्स कंपनीने सोन्याची शुद्धता आणि वजनाची अपुरी तपासणी, जास्त रोखीने कर्ज देणे, मानक लिलाव प्रक्रियेपासून विचलन आणि ग्राहक खात्यावरील शुल्कामध्ये पारदर्शकता नसणे यासारख्या नियमांकडे दुर्लक्ष केल्यामुळे आरबीआयने या फायनान्सवर कारवाई केली आहे.

# राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा ६ जुलैला

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेतली जाणारी राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा शनिवारी ६ जुलैला घेतली जाणार असल्याची घोषणा बुधवारी आयोकडून करण्यात आली. राज्य सरकारच्या विविध भागांमधील ५२४ रिक्त पदे भरण्यासाठी ही परीक्षा घेतली जाणार आहे.

याआधी राज्यसेवा पूर्व परीक्षेसाठी २९ डिसेंबर २०२३मध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या जाहिराती २७४ पदांसाठी २८ एप्रिल २०२४मध्ये परीक्षा होणार असल्याचे लिहिले होते. मात्र त्याच वेळेस राज्य सरकारकडून मराठा आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला. त्यात १० टक्के स्वतंत्र आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे ही परीक्षा पुढे ढकलली गेली. त्यामुळे सुधारित वेळापत्रकानुसार आता ६ जुलेला राज्यसेवा पूर्व परीक्षा घेतली जाणार आहे.

उप जिल्हाधिकारी, गट-अ (७ पदे),सहाय्यक राज्य कर आयुक्त, गट-अ (११६ पदे), गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी),गट-अ (५२ पदे), सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ (४३ पदे)

मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी, गट-ब (१९ पदे) , सहायक गट विकास अधिकारी, गट-ब (२५ पदे)सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), आदिवासी विकास आयुक्तालय, गट-ब (५२ पदे) , निरीक्षण अधिकारी (पुरवठा), गट-ब (७६ पदे) , सहायक वनसंरक्षक, गट-अ, (३२ पदे), वनक्षेत्रपाल, गट-ब, (१६ पदे) , स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षा – मृद व जल संधारण विभाग (४५ पदे).

अर्ज सादर करण्यासाठी कालावधी

९ मे २०२४ ते २४ मे २०२४ला २३.५९ वाजेपर्यंत

ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याची मुदत – २४ मे २०२४ला २३.५९ वाजेपर्यंत

भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची मुदत २६ मे २०४ला २३.५९वाजेपर्यंत आहे. चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम मुद २७ मे २०२४ला आहे.

# मानवजातीच्या कल्याणासाठी बसवेश्वर महाराजांच्या कार्याच्या अनुकरणाची नितांत गरज

**बसवेश्वर** महाराजांना कोणत्याही प्रकारचा लोभ नसल्यामुळे न्याय प्रीय राजा होते.बसवेश्वर महाराज हे बसव,बसवण्णा इत्यादी नावाने ओळखले जात असले तरीही थोर समाजसुधारक म्हणून त्यांची ख्याती होती.त्यामुळे त्यांचे कार्य आजही तेवढेच महत्त्वाचे व गरजेचे आहे.इ.स.११०५ ते ११६५या कालखंडात होऊन गेलेले कर्नाटकातील संत व समाजसुधारक होते.त्यांनी नेहमी निर्गुण व निराकार एकेश्वरवाद श्रध्देचा पुरस्कार केला. कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या गावात ११०५ साली वीरशैव कुटुंबात बसवेश्वर महाराजांचा जन्म झाला. मुख्यत्वेकरून त्यांचा जन्म अक्षतृतीयेला झाला.



अक्षतृतीया हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक व महत्वाचा दिवस मानल्या जातो. त्यामुळे या दिवसाला शुभ मानण्यात येते. बसवेश्वर कर्मठ विधीचा विरोध करायचे अशा परिस्थितीत मुंजीचा विरोध करून मला आधीच लिंगदीक्षा मिळाली आहे असे सांगत वयाच्या ८ व्या वर्षी घर सोडून ते कूडलसंगम येथे निघून गेले.कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे मोठे अध्ययन केंद्र होते.तेथे बसवेश्वरांनी १२ वर्षे वास्तव्य केले.

कुडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा,धर्म, तत्वज्ञान इत्यादींचा प्रगल्भ अभ्यास केला.त्यांचा विवाह मामाच्या मुलीशी झाला व त्यानंतर सोलापूरातील मंगळवेढा येथे आले.बसवेश्वरांनी मंगळवेढा येथे लोकशाही संसद स्थापन केली.या संसद मंडपात सर्व धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणींवर कशी मात करायची यावर चर्चा करून व योग्य निर्णय घेवून पुढील कार्य होत असे.बसवेश्वर यांचे एकच उद्दिष्ट होते ते म्हणजे समाजातील वाईट चालीरितीचा विरोध करून समाजाच्या हिताच्या गोष्टींची अंमलबजावणी करण्याकडे जास्त महत्त्व देत असे. १२ व्या शतकातील आदर्श, समतेचे, जनकल्याणाकारी प्रणेते म्हणून बसवेश्वर महाराज ओळखले जायचे.त्यामुळेच १२ व्या शतकापासून खऱ्या अर्थाने लोकशाहीला सुरूवात झाल्याचे सांगण्यात येते. कारण लोकशाहीमध्ये समता, मुल्य,न्याय,बंधूंता, एकात्मता, संपूर्ण स्वतंत्र, अधिकार,नियम, नियंत्रण, शिस्त,सूशासन व योग्य प्रशासन यामुळे समाज व देश घडण्यास मोठी मदत मिळते.बसवेश्वर महाराजांच्या संसदेत जातीभेला बीलकुलच थारा नव्हता.त्यामुळे त्यांना समाजाला एकत्र बांधण्यास मोठी मदत मिळाली.कारण कोणत्याही प्रकारचा भेदभाव ते कदापि सहन करत नसे.आपल्याला २१ व्या शतकात जे कायदे दिसतात त्यात बसवेश्वर महाराजांचा मोठा वाटा आहे.बसवेश्वर महाराजांना साक्षात नंदीचा अवतार मानल्या जाते.आपण ज्याला शंकरजीचा वाहन म्हणतो.भगवान शंभर या पृथ्वीचा,मानव, पशुपक्षी व जीवजंतू यांचा पालनहार आहे.त्यांच्या सोबत नंदी म्हणजे साक्षात परमेश्वर बसवेश्वर महाराज म्हणजे ही दैवी लीलाच म्हणावी लागेल.

कृष्णा आणि मलापहारी नद्यांच्या संगमावर असलेल्या गुरूकुलात ज्ञानी गुरूजनांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिक्षण घेतले.विविध ग्रंथांचा, ज्ञानाच्या सर्व शाखांचा अभ्यास केला.त्यामुळेच त्यांनी संस्कृत ग्रंथातील धर्मतत्वे कन्नडमधुन लिहिली.

बसवेश्वर महाराजांनी नेहमी आध्यात्मिक जीवन व समाज घवीण्याच्या चालीरीतीचे मार्गदर्शन नेहमीच करीत असे.कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्रात आपल्याला लोकांच्या जिभेवर आजही बसवेश्वरांची वचने आरूढ झाल्याचे दिसून येते.सत्ता वैभव आणि कीर्ती याला एतकींचीतही वाव न देता आध्यात्मिक व नीतिमुल्याला प्रथम प्राधान्य देवून समाज हितासाठी अहोरात्र प्रयत्न केले.बसवेश्वरांच्या काळात समाजव्यवस्थेत स्त्रीयांना शुद्र, बहिष्कृत समजले जायचे.त्यांना स्त्रीयांवर होत असलेला अत्याचार सहन झाला नाही.याकरीता त्यांनी या विरूद्ध मोठा लढा उभारून मोठे भरीव कार्य केल्याचे दिसून येते.तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह महात्मा बसवेश्वरांच्या पुढाकाराने १२ व्या शतकात घडला.त्यामुळे बसवेश्वर महाराजांचे प्रत्येक कार्य व त्यांची जीवनशैली आज समाजाला प्रेरणादायी ठरू शकते. आज देशातील राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्वर महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन समाज हितांचे व देश हिताचे कार्य करण्याची नितांत गरज आहे.राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्वर महाराजांचे अनुकरण करून भ्रष्टाचार व वाजवीपेक्षा जास्त चल-अचल संपत्तीचा त्याग करून सरकारी तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे व महात्मा बसवेश्वरांचे आदर्श सामोरं ठेऊन समाजकार्य केले तरच खऱ्या अर्थाने राजकीय पुढाऱ्यांमार्फत बसवेश्वर महाराजांची जयंती साजरी झाली असे गृहीत धरले जाईल.कारण राजकीय पुढाऱ्यांजवळ समाजसेवक, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी अशी मोठी जबाबदारीची आणि नामांकित पदे आहेत.त्याचा उपयोग समाज घडविण्यासाठी व्हायलाच हवा.बसवेश्वर महाराजांजवळ कोणतेही पद नसताना समाज हितासाठी अहोरात्र कार्य केले.कारण ते त्यागी, निष्ठावान,महान समाजसेवक व समाजसुधारक होते.त्यांचे अनुकरण करून आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी कार्य करण्याची नितांत गरज आहे.वैशाख शुद्ध तृतीया म्हणजे अक्षय्य तृतीया यांच दिवशी महात्मा बसवेश्वरांचा जन्म झाला.त्याचप्रमाणे याच दिवशी पराक्रमी भगवान परशुराम यांचाही जन्म झाला हा एक संयोगच म्हणावा लागेल.अक्षय्य तृतीया या शुभ मुहूर्ताचे औचित्य साधून,महात्मा बसवेश्वर आणि भगवान परशुराम यांच्या जयंतीचे शुभ संकेत लक्षात घेता. या भारत भुमित आजच्या दिवशी प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावुन आगळावेगळा ऐतिहासिक उपक्रम राबवुन पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प संपूर्ण मानवजातीने करायला हवा.कारण मानवजातीच्या कल्याणासाठी आज चार दैवी शक्ती एकत्र विराजमान आहेत.त्यामुळे तीन दैवी शक्तीचा (अक्षय्य तृतीया, बसवेश्वर जयंती, परशुराम जयंती) हा दिवस कधीच पहायला मिळणार नाही असा संयोग दिवस १० मे रोजी उजाडला आहे.यामुळे प्रत्येकांनी वृक्षारोपण करून मानवजातीचा धर्म पाळला पाहिजे. यामुळे ऑक्सिजनची मात्रा वाढेल व मानवजातीचे कल्याण होईल, गुरांना मोठ्या प्रमाणात चारा मिळेल, पशुपक्ष्यांना शुद्ध हवा व सावली मिळेल. यातच आपल्याला अक्षय्य तृतीया,महात्मा बसवेश्वर,भगवान परशुरामाचे दर्शन घडुन येईल यात दुमत नाही. कारण संपूर्ण वृक्षांच्या जळामुळात, फळात, फुलात, पाणात व झाडांच्या कनाकनात आपल्याला थोरमहात्मांचा,साधुसंतांचा व देवीदेवतांचा वास अवश्य दिसून येईल.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो. नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# श्रीविष्णूचा सहावा अवतार परशुराम उपास्यदेवता

**अग्रतश्चतुरो वेर्दो**
**पृष्ठतः सशरं धनुः ।**
**इदं ब्राह्मम् इदं क्षात्रं**
**शापादपि शरादपि ?**

चारही वेद मुखोद्गत करून आहेत ब्राह्मतेज जोपासणारा व क्षात्रतेजाची खूण म्हणून पाठीवर धनुष्यबाण बाळगणारा भगवान परशुराम विरोधकांना शापाने अथवा शस्त्राने हरवील.

भगवान परशुरामांच्या अतुलनीय गुणवैशिष्ट्यांची ओळख या एका श्लोकावरून होते.

श्रीविष्णूचा सहावे अवतार परशुराम उपास्यदेवता म्हणून पुजले जातात. परशुरामाची आई रेणुका व वडील भृगुकुलोत्पन्न ऋषी जमदग्नी हे होत. एकोणिसाव्या त्रेतायुगात (महाभारतानुसार त्रेता व द्वापार युगांच्या संधीकालात) परशुरामाचा जन्म झाला. वैशाख शुद्ध तृतीयेला येणारी परशुराम जयंती उत्सव म्हणून साजरी केली जाते. परशुरामांच्या कथा रामायणात, महाभारतात व काही पुराणांत आढळतात. त्याच्या आधीच्या अवतारांसारखे त्याच्या नावाचे स्वतंत्र पुराण नाही. भगवान परशुराम हे शत्रूचे निर्दालन करण्यासाठी ब्राह्म आणि क्षात्र या दोन्ही तेजांचा उत्कृष्ट उपयोग करणारे श्रेष्ठतम योद्ध्याचे उत्तम उदाहरण आहे. भगवान परशुरामाची गुणवैशिष्ट्ये विशद करणारा सनातन संस्थेद्वारा संकलित लेख त्यांच्या चरणी सविनय अर्पण ! आपणही साधना करून ब्राह्मतेज आणि धर्मरक्षण करून क्षात्रतेज जागवूया !

१. सप्तचिरंजिवांपैकी एक

अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च बिभीषणः।
कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः ?

अर्थ : अश्वत्थामा, बळी, महर्षि व्यास, हनुमान, बिभीषण, कृपाचार्य आणि परशुराम हे सप्त चिरंजीव आहेत.

परशुरामाने काळावर विजय प्राप्त केला आहे. त्यामुळे तो सप्तचिरंजीवांपैकी एक आहे. प्रातःसमयी त्याचे स्मरण केल्याने पुण्य प्राप्त होते.

२. श्रीविष्णूचा सहावा अवतार

सत्ययुगात मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह आणि वामन हे श्रीविष्णूचे पाच अवतार झाले. त्रेतायुगाच्या प्रारंभी महर्षी भृगु यांच्या गोत्रात जामदग्नेय कुळात महर्षि जमदग्नी आणि रेणुकामाता यांच्या पोटी श्रीविष्णूने सहावा अवतार घेतला. त्याचे नाव परशुराम होते. भार्गवगोत्री असल्याने त्यास भार्गवराम असेही संबोधले जात असे.

३. अपराजेय योद्धा असलेल्या कार्तवीर्य सहस्रार्जुनाचा विनाश करण्यासाठी परशुरामाने केलेला अद्वितीय पराक्रम !

अ. परशुरामाने तपश?चर्या करून सहस्रार्जुन कार्तविर्यापेक्षा अधिक तपोबल अर्जित केल्याने सूक्ष्म स्तरावर कार्तवीर्य सहस्रार्जुनाच्या पराभवाचा आरंभ होणे

हैहय वंशातील अधर्मी राजा महिष्मती नरेश कार्तवीर्य सहस्रार्जुनाने सहस्रो वर्षे कठोर तपश्चर्या करून भगवान दत्तात्रेयांना प्रसन्न करून घेतले आणि असीम बलशाली बनून सहस्रो भुजा धारण करण्याचे वरदान प्राप्त केले होते. अशा कार्तवीर्य सहस्रार्जुनाचा नाश



करता यावा, यासाठी त्याच्या तपोबलापेक्षा अधिक तपोबल अर्जित करण्यासाठी परशुरामाने शिवाला प्रसन्न करण्यासाठी कठोर तपश?चर्या केली. कार्तविर्याचे तपोबल परास्त करण्यासाठी परशुरामाने त्याहून कठोर तपश?चर्या करून ब्राह्मतेजाच्या शस्त्राने कार्तविर्याच्या पुण्यबळावर एकप्रकारे प्रहार करून त्याला क्षीण केले. त्यामुळे कार्तविर्याच्या सहस्रावधी भुजांद्वारे कार्यरत असणाऱ्या सूक्ष्म कर्मेंद्रियांची दिव्य शक्ती निष्प्रभ होऊ लागली आणि अधर्माचे प्रतीक असणाऱ्या कार्तविर्याच्या पराभवाचा सूक्ष्मातून आरंभ झाला. कार्तविर्याला पराभूत करण्यासाठी भगवान परशुरामाने दिलेला हा आध्यात्मिक स्तरावरील लढा अद्वितीय आहे.

आ. गोधन चोरणाऱ्यांचा विनाश होवो, असा संकल्प करून तो पूर्णत्वास नेणे

कार्तवीर्य सहस्रार्जुनाने ऋषी दांपत्याच्या विरोधाला न जुमानता जमदग्नी आश्रमातून कामधेनूला बलपूर्वक स्वतःसमवेत नेऊन गोमातेचे अपहरण केले. ही घटना घडली, त्या वेळी परशुराम आश्रमात नव्हता. तो घनघोर अरण्यात कठोर तपश्चर्या करण्यात मग्न होता. जेव्हा तो जमदग्नींच्या आश्रमात पोचला, तेव्हा त्याला घडलेला प्रकार समजला. कार्तवीर्य सहस्रार्जुनाच्या कह्यात असणाऱ्या कामधेनूची मुक्तता करून गोमाता आणि गोधन यांचे संरक्षण करण्यासाठी त्याने गोधन चोरणाऱ्यांचा विनाश होवो, असा संकल्प केला. त्याची शापवाणी खरी ठरली; कारण गोधन चोरल्याचा अपराध केल्यामुळे कार्तविर्याचा पुण्यक्षय झाला. जमदग्नीऋषींवर प्राणघातक आक्रमण केल्यामुळे कार्तविर्याच्या पुत्रांनाही पातक लागले. परशुरामाने कार्तविर्याच्या कुळाचा विनाश करण्याचा केलेला संकल्प पूर्णत्वास नेऊन गोमातेची मुक्तता करून तिला पुन्हा जमदग्नींच्या आश्रमात आदराने आणले.

४. भगवान परशुरामाने केलेले अपूर्व अवतारी कार्य आणि पराक्रम यांची ठळक उदाहरणे

अ. २१ वेळा पृथ्वी प्रदक्षिणा करून संपूर्ण पृथ्वी निःक्षत्रिय करणे – भगवान परशुरामाने एकट्याने संपूर्ण पृथ्वीला २१ वेळा प्रदक्षिणा घालून पृथ्वीवर माजलेल्या अहंकारी आणि अधर्मी क्षत्रियांचा निःपात केला. अशा प्रकारे पृथ्वी प्रदक्षिणा घालून त्याने पृथ्वीचा भार हलका केला आणि त्याचसमवेत पृथ्वी प्रदक्षिणा घालण्याचे परम पुण्यही प्राप्त केले.

आ. सहस्रो क्षत्रिय आणि लक्षावधी सैन्य यांच्याशी एकट्याने लढण्याचे अपूर्व सामर्थ्य असणे – प्रजेचा छळ करून संपूर्ण पृथ्वीवर उपद्रव माजवणाऱ्या क्षत्रियांची संख्या सहस्रो होती. त्यांच्याजवळ लक्षावधी अक्षौहिणी सैन्यबळ होते. भगवान परशुराम हा नरदेह धारण केलेला साक्षात् श्रीमन्नारायणच होता. त्यामुळे त्याच्यात सहस्रो क्षत्रिय आणि लक्षावधी सैन्य यांच्याशी एकट्याने लढण्याचे अपूर्व सामर्थ्य होते.

इ. दानशूर – एकछत्र सम्राटाप्रमाणे अखिल भूमीचा अधिपती असूनही अश?वमेध यज्ञाच्या वेळी परशुरामाने यज्ञाचे अध्वर्यू महर्षि कश्यप यांना संपूर्ण पृथ्वीचे दान दिले. यावरून परशुराम किती दानशूर होता, हे दिसून येते.

ई. नवसृष्टीची निर्मिती करणे – भगवान परशुरामाने अवघ्या तीन पावलांत समुद्र मागे हटवून क्षणार्धात परशुराम भूमीची निर्मिती केली आणि चितेतून चित्तपावन ब्राह्मणांची निर्मिती करून परशुराम क्षेत्रात नवीन सृष्टीच साकार केली.

उ. क्षेत्रपाल देवतांची स्थाने प्रस्थापित करणे – परशुरामाने २१ वेळा पृथ्वी-प्रदक्षिणा करतांना १०८ शक?तीपीठांची, तीर्थक्षेत्रांची, म्हणजेच क्षेत्रपाल देवतांची स्थाने प्रस्थापित केली.

५. तेज रामात संक्रमित करणे : एकदा (दशरथपुत्र) रामाची कीर्ती ऐकून त्याच्या पराक्रमाची परीक्षा पहाण्यासाठी परशुराम त्याच्या वाटेत आडवा आला व आपले धनुष्य रामाच्या हातात देऊन ते वाकवून त्याला बाण लावून दाखवण्यास सांगितले. रामाने तसे केले व हा बाण मी कशावर सोडू म्हणून विचारले. 'माझी या (काश्यपी) भूमीवरची गती निरुद्ध कर', असे परशुरामाने सांगितल्यावर रामाने तसे केले. या प्रसंगी परशुरामाने स्वत:चे धनुष्य रामाला देऊन टाकले. अशा प्रकारे परशुरामाने धनुष्य देऊन आपले क्षात्रतेज रामात संक्रमित केले.

६. धनुर्विद्येचा सर्वोत्तम शिक्षक : एकदा शस्त्र खाली ठेवल्यानंतर परशुरामाने क्षत्रियांशी वैरभाव सोडून दिला व ब्राह्मण, क्षत्रिय या सर्वांना समभावाने अस्त्राविद्या शिकवायला सुरुवात केली. महाभारतातील भीष्माचार्य, द्रोणाचार्य इत्यादी थोर योद्धे परशुरामाचेच शिष्य होते.

दुष्टांचे निर्दालन करण्यासाठी ब्राह्म आणि क्षात्रतेज यांचा उत्कृष्ट उपयोग करणारे योद्धावतार भगवान परशुरामाच्या चरणी शिरसाष्टांग नमस्कार !

# प्रांतोप्रांतीची 'अक्षय' तृतीया

'व्हायब्रंट इंडिया' म्हटलं जातं ते उगाच नाही. भारताइतकी व्हरायटी आणि एकाच गोष्टीचे इतके पर्याय खरंच इतर कोणत्याही संस्कृतीत सापडणार नाहीत. अतिशय जुनी अशी आपली परंपरा आहे. गेली काही हजार वर्ष ती टिकून आहे आणि आजही त्यात त्याच परंपरा पाळल्या जातात. आपल्याकडे साजरे होणारे वेगवेगळे सण हे तर सगळ्या लोकांना वाटणारं महाआश्चर्य आहे. एकतर निसर्गाला धरून तयार केलेले हे सण आणि त्याचं निसर्गसंवर्धनासाठी किंवा शेतीच्या कामासाठी असलेलं महत्त्व यामुळे आपल्या पूर्वजांनी किती खोल विचार केला होता याची कल्पना येते. आपल्याकडे फक्त एका धर्माचेच सण साजरे केले जात नाहीत तर सगळ्या धर्माच्या सणांना महत्त्व आहे. तरीही पूर्वीपासून हिंदुबाहुल्य असल्याने हिंदू सणांची आपल्याकडे असलेली महती काही औरच आहे. ज्या ज्या प्रदेशात आर्य गेले तिथल्या संस्कृती त्यांनी या सणात गोवल्या आणि त्यात समरसून जाण्याचा प्रयत्न केला. म्हणून एकच सण भारताच्या वेगवेगळ्या प्रांतात निरनिराळ्या नावाने ओळखला जातो आणि त्याची साजरी करण्याची पध्दतीही वेगळी आहे. मात्र त्यामागचा विचार समान आहे. हिंदू कालगणनेप्रमाणे वैशाख महिन्यातील शुध्द तृतीयेला येणारा अक्षय्य तृतीया हा सणही असाच महत्त्वाचा आहे. या सणाचं धार्मिक आणि व्यापारी महत्त्वही मोठं आहे. आपल्याकडे साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक अक्षय्य तृतीया मानला जातो. अक्षय्य हा शब्द संस्कृत मध्ये ज्याचा क्षय (अंत) होत नाही असा या अर्थी वापरला जातो. म्हणून या दिवशी ज्याची सुरुवात होते ते अक्षय्य असतं अशीही एक कल्पना आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो.:९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला सुरक्षा व्यवस्थेचा आढावा

## निर्भय-निष्पक्ष निवडणुकांसाठी कायदा सुव्यस्थेचे नियोजन

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- निवडणुका निर्भय आणि निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी कायदा व सुव्यवस्थेच्या नियोजनाचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज आढावा घेतला.




जिल्हाधिकारी कार्यालयात ही बैठक आज पार पडली. पोलीस आयुक्त मनोज लोहिया, पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक संतोष झगडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी तसेच सुरक्षा व्यवस्थांशी निगडीत नोडल अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील शहरी व ग्रामिण भागात मतदानाला सुरुवात होण्याच्या ७२ तास आधी सुरक्षा व्यवस्थांच्या अनुषंगाने काय नियोजन करावे व खबरदारी घ्यावी याबाबत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. अखेरच्या ७२ तासांत पोलिसांनी पथसंचलन करुन नागरिकांमध्ये निर्भय निवडणुकांबाबत आत्मविश्वास निर्माण करावा. प्रत्येक पोलीस स्टेशन मध्ये निवडणुक आचार संहिता भंगासंदर्भात येणाऱ्या तक्रारींची तात्काळ नोंद करण्यात यावी. प्रचारादरम्यान होणाऱ्या आचारसंहिता भंगाच्या घटनांवर तात्काळ कारवाई करणे. आंतरजिल्हा सिमांवर वाहनांची तपासणी, शहरात येणाऱ्या रस्त्यांची नाकाबंदी करुन तपासणी पथकांनी तपासणीसाठी सज्जता ठेवावी. प्रामुख्याने मद्य, अंमलीपदार्थ, रोकड, शस्त्रे इ. च्या वाहतुकीबाबत तपासणी करावी. याशिवाय मंगल कार्यालये, सभागृहे, धर्मशाळा, गेस्ट हाऊसेस अशा ठिकाणांची तपासणी करावी. तेथे बाहेरुन लोक येऊन थांबले आहेत का, सुरु असलेल्या जेवणावळी याबाबत तपासणी करण्याचेही निर्देश देण्यात आले. तसेच मतदानासाठी जाणारे कर्मचारी, मतदान यंत्राची वाहतुक, मतदानानंतर मतदान यंत्रे जमा करावयाचे स्ट्रॉंग रुम यांचा बंदोबस्त, प्रत्यक्ष मतदान केंद्रांवरील बंदोबस्त, मतदान केंद्राच्या १०० मिटर परिसरातील बंदोबस्त याबाबत बैठकीत निर्देश देण्यात आले.

जिल्ह्यातील सुरक्षा पथकांनी निर्भय निष्पक्ष निवडणुकांसाठी सज्ज असल्याचा विश्वास मतदारांमध्ये निर्माण करावा,असे निर्देशही जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

# ट्युशनच्या विद्यार्थ्यांमध्ये तुंबळ हाणामारी; चाकू, लाठ्या काठ्या बाहेर

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- ट्युशनसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांनी लाठ्या-काठ्या, बेल्टसह तुंबळ हाणामारी करून एकमेकांवर दगडफेक केल्याची घटना एन-१ मध्ये घडली. महावितरण कार्यालयाच्या विरुद्ध दिशेला असलेल्या ट्युशनचे ४० ते ५० विद्यार्थी व अन्य टवाळखोरांमध्ये बुधवारी दुपारी १२ वाजता ही घटना घडली. आरडाओरडा व दगडफेकीमुळे स्थानिकांना मात्र मोठा मनस्ताप सहन करावा लागला. काही दिवसांपूर्वी याच विद्यार्थ्यांच्या भांडणातून थेट चाकू काढले गेले. मात्र, ट्युशनच्या संचालकांकडून याची गांभीर्याने दखल घेतली गेली नाही.

नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, दुपारी १२ वाजेच्या सुमारास महावितरण कार्यालयासमोरील एका खासगी क्लासेसचे काही विद्यार्थी गणवेशात मॉस्को कॉर्नर परिसरात जमा झाले होते. थोड्याच वेळात काही बाहेरील टवाळखोरही तेथे दाखल झाले. एकमेकांना मोठमोठ्याने शिवीगाळ सुरू करून त्यांच्यात तुंबळ हाणामारी सुरू झाली. लाठ्या- काठ्यांसह एकमेकांना ते बेल्टने मारहाण करीत होते. त्यातील काहींनी एकमेकांना दगड फेकून मारण्यास सुरुवात केल्याने नागरिक घराबाहेर आले. यातील काही दगड नागरिकांच्याही घरावर गेले. स्थानिक मोठ्या प्रमाणात जमा झाल्यानंतर मात्र सर्वांनी पोबारा केला.

काही दिवसांपूर्वीच ट्युशनचे विद्यार्थी व बाहेरील टवाळखोरांमध्ये ट्युशनच्या समोरच हाणामारी होऊन थेट चाकू काढले गेले होते. स्थानिकांनी याचो मोबाइलमध्ये चित्रण करण्याचा प्रयत्न केल्यावर त्यांना धमकावण्यातदेखील आले. काही महिन्यांपूर्वीच याच ट्युशनसंबंधित एका विद्यार्थिनीच्या वादातून दोन मुलांचे अपहरण करून मारहाण व विनयभंगाचे गुन्हे दाखल झाले होते. दरम्यान, बुधवारच्या घटनेत रात्री उशिरापर्यंत कुठलीही नोंद नसल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# 'गच्चीवरील बागेचे महत्त्व व शहरी जीवनासाठी एक वरदान' पुस्तिकेचे विमोचन



छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- वी.वी.फॉर एन्व्हायरमेंट, द इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स तसेच देवगिरी इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग अँड मैनेजमेंट छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने टेरेस फार्मिंग/ किचन गार्डनिंग व बायो एन्झाईम प्रक्रिया तंत्रज्ञान या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन रविवार ला इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स च्या श्री भानुदासराव चव्हाण सभागृहामध्ये सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ या वेळामध्ये आयोजन करण्यात आले.

आपल्या दैनंदिन जीवनामध्ये आणि गच्चीवरील बागेमध्ये बायोएंझाइम कसे बनवायचे व त्याचा वापर कसे करावे याचे श्री दीपक जी मोताळे नांदेड यांनी मार्गदर्शन केले. गच्चीवरील बाग काम करत असताना येणाऱ्या अडचणी व त्यावर उपाय आणि व्यवस्थापनासाठी जीवामृत आणि नैसर्गिक संसाधनांचे महत्त्व या विषयावर श्री तुषार देसाई मुंबई यांनी माहिती व प्रात्यक्षिक स्वरूपात मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेस अध्यक्ष म्हणून द इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स कॉलेजचे प्राचार्य श्री उल्हास शिंदे सर तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य डॉक्टर सर्जेराव ठोंबरे सर, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा. श्री तुषार देसाई मुंबई , मा. दीपक मोरताळे नांदेड होते. श्री कमल जी पहाडे, श्री संजय आंबेकर सर यांच्या उपस्थित मान्यवरांच्या आणि कार्यशाळेत सहभागी असलेल्या प्रतिनिधीच्या हस्ते झाडाला पाणी देऊन उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाची प्रस्तावना श्री कमलजी पहाडे यांनी व्ही व्ही एन्व्हायरमेंट या संस्थेची पर्यावरण क्षेत्रामध्ये केल्या जाणाऱ्या कामकाजा संदर्भात तसेच उद्दिष्ट संदर्भात सविस्तर माहिती दिली. मा डॉ सर्जेरावजी ठोंबरे यांनी कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी शुभेच्छा देताना असे म्हटले की सध्याच्या धावपळीच्या आणि धकाधकीच्या तसेच महागाईच्या ताण-तणावाच्या काळामध्ये शहरातील गर्दीतील प्रदूषणाच्या विळख्यात अडकलेल्या नागरिकांना आपल्या आयुष्यामध्ये आनंद तणावमुक्त जीवनशैलीची गरज भागवण्यासाठी गच्चीवरील बागकाम हा एक उत्तम पर्याय आहे . अध्यक्ष माननीय श्री उल्हास शिंदे सर यांनी या कार्यशाळेच्या शुभेच्छा देताना असे मत व्यक्त केले की या कार्यशाळेमुळे बाग काम करत असताना आपल्या वैयक्तिक जीवनामध्ये आणि वैयक्तिक आरोग्यामध्ये होणारे फायदे सांगितले. उदाहरणार्थ घरातील कचऱ्या कचऱ्यापासून होणारे खत निर्मिती आणि या खत निर्मितीच्या वापरामुळे घरच्या घरी निर्माण होणारा ताजा आणि विषमुक्त भाजीपाला फुले फळ याचे उत्पादन व सेवन आपण करू शकतो. कामामुळे नियमित व्यायाम व शारीरिक हालचाल झाल्यामुळे मानसिक आजार कमी होतात असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रामध्ये दीपक जी मोताळे यांनी बायो एन्झाईन तयार तयार करण्यासाठी लागणारे घटक, निर्मितीमध्ये वापरले जाणारे साहित्य आणि या बायो एंजाइम निर्मितीसाठी लागणारा कालावधी, आपल्या दैनंदिन जीवनामध्ये त्याचा वापर कोण कोणत्या बाबीसाठी केला जातो या संदर्भात सखोल मार्गदर्शन केले.

## उध्दव ठाकरे यांची आज शहरात सभा

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची शुक्रवारी १० मे रोजी सायंकाळी ६ वाजता मराठवाडा सांस्कृतिक मंडळावर जाहीर सभा होणार आहे. छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या प्रचारार्थ होणाऱ्या जाहीर सभेस महाविकास आघाडीच्या नेत्यांची उपस्थिती राहणार असल्याचे खैरे यांच्या प्रचार कार्यालयातून सांगण्यात आले.

# प्रभात बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने मतदान जन जागृती कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर प्रभात बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, छत्रपती संभाजीनगरच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व, अधिकार याविषयी जन जागृती तसेच मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून पळशी ता. जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तसेच नवीन मोंढा, जाधववाडी येथे जन जागृती कार्यक्रम घेण्यात आला.



यावेळी संस्थेचे अध्यक्ष व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी संस्थेचे अध्यक्ष अनंत चोंधे (मोहाडीकर) यांनी नागरिकांना जास्तीत जास्त संख्येने मतदान करावे व लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

# प्रखर राष्ट्रनिष्ट्रा आणि धैर्याचे प्रतीक राष्ट्रवीर महाराणा प्रतापसिंहाचे संघटन तंत्र अंगिकारण्याची गरज-धोंडीरामसिंह राजपूत

वैजापूर दि.९ (प्रतिनिधी)- हिंदवी सुरज वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांनी संपूर्ण मानवजातीला स्वाभिमानाने जगणे शिकविले. त्यांनी विपरीत परिस्थिती ही काही राष्ट्रनिष्ट स्वाभिमानी राजपूत,आदिवासी यांना संघटित करून जुलुमी मोगल राजवटीशी केलेला सामना याला इतिहासात तोड नाही,अशा महान राष्ट्रवीरांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन समाजहित व राष्ट्रहित चिंतणाऱ्या आजच्या समाज कार्यकर्त्यांनी सामाजिक ऐक्य घडवून आणून समाजसमोरील ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा असे वक्तव्य माजी शिक्षणाधिकारी व राजपूत समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी छत्रपती संभाजीनगर येथीक कॅनॉट प्लेस येथे हिंदवी सूर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या४८४व्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात गुरुवार (ता.०९)रोजी केले.



ते पुढे म्हणाले की, राजपूत,/परदेशी समाजाचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत,त्या साठी एकनिष्ठ संघटन काळाची गरज आहे,ते पुढे म्हणाले की,जयंती/पुण्यतिथी च्या कार्यक्रमात सर्व मतभेद बाजूला ठेऊन सर्वांनी उपस्थित राहावे, व समाज हितासाठी मतभेद विसरून प्रबळ संघटन उभे करावे.

क्रांती सूर्य महाराणा प्रतापसिंह जन्मोत्सव / जयंती समितीचे अध्यक्ष कंवरसिंग बैनाडे, उपाध्यक्ष विश्वनाथ राजपूत,श्रीमती चंदाताई राजपूत, स्वागताध्यक्ष बिजू मारग,उपस्वागताध्यक्ष सुदाम भाऊ राजपूत, सचिव जयसिंग खोकड, कार्याध्यक्ष देवीचंद्र बरवाल,पदमसिग राजपूत, जगजीतसिंग परिहार, डॉ.सुनील राजपूत, डॉ.प्रा.गुरुदत्त राजपूत,विजयसिंग झाला. डॉ,गीता शेवंगण यांच्या उपस्थितीत समाजाच्या युवकांची एक भव्य एकता बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीचा समारोप कॅनॉट प्लेस येथे सभेत झाला. या ठिकाणी हिंदवी सूर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याला सर्वांनी अभिवादन केले.

कार्यक्रम अध्यक्ष कंवरसिंग बैनाडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी सुभाष मेहर,अजबसिंग शिहिरे, भाग्यश्री राजपूत,विक्रमसिंग पवार, रामसिंग बहुरे,महाजन चुंगडे, हरिसिंग दादा, तसेच समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते,शेवटी अध्यक्षीय समारोप कंवरसिंग बैनाडे यांच्या भाषणाने झाला. सायंकाळी ही बाईक रॅली काढण्यात आली.

(पान १ वरुन)

## राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन होणार नाही...

पवारांना यांना विचारले असता त्यांनी सांगितले की आतापर्यंत अदानी आणि अंबानी यांचे संबंध कोणाबरोबर जोडले आहेत. ते कोणाचे दोस्त आहेत. याबद्दल कोणाची चर्चा सुरू आहे. याचा परिणाम पक्षाच्या मतदानावर होऊ नये यासाठी ते दुसऱ्या पक्षांची नावे घेऊन दुसरीकडे वळवत असल्याचे पवार म्हणाले.

देशातील पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्याचे मतदान हे पंतप्रधान मोदींना अस्वस्थ करणार आहे. त्याचे कारण म्हणजे निवडणुकीचे पहिले दोन टप्पे संपल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या प्रचार सभेतील स्वर बदलला आहे. त्यांनी आता उघडपणे मुस्लीम समाजाला विरोध केला. त्यांना आता लक्षात आले की, धर्मांध विचार घेऊनच आपल्याला मदत होऊ शकते, एवढंच नाही, जसजसे निवडणुकीचे टप्पे पुढे जातील तसे त्यांचे स्थान हे संकटात जाईल, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, १७ मे रोजी मुंबईत होत असलेल्या राज ठाकरे आणि नरेंद्र मोदी यांची एकत्र सभा होत असेल तर यातून स्पष्ट होते की, मोदी साहेबांना कोणाची ना कोणाची मदत हवी. त्यामधून मोदींचा आत्मविश्वास दिसून येतो, असे शरद पवार यांनी सांगितले. शरद पवार यांना सभा घ्यायला लावत आहात, त्यांना आराम द्या, तुम्ही प्रचार करा, असे अजित पवार यांनी शरद पवार गटाच्या नेत्यांना सुनावले होते. त्यावर शरद पवार यांनी देखील प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, मला कोणी त्रास देत नाही. सगळेजण माझ्यासोबत प्रेमाने वागतात. आमची सगळ्यांची पडेल ते कष्ट घेण्याची तयारी आहे, असे शरद पवार म्हणाले.

## शरद पवारांचा मुलगा असतो तर चांगली...

पण मी त्यांचा मुलगा नाही म्हणून मला संधी नाही, हा कसला न्याय?, असा प्रश्न अजित पवारांनी उपस्थित केला. आम्ही दिवसरात्र काम केलं. सगळा जिल्हा सांभाळला. शरद पवारांकडे जिल्हा बॅंक नव्हती. ती बॅंक वेगळे लोक सांभाळायचे. मी राजकारणात आल्यापासून बॅंक राष्ट्रवादीच्या ताब्यात ठेवली आहे. यांचा प्रत्येक शब्द पाळला. मी शब्दाचा पक्का आहे. एकदा दिलेला शब्द पाळतो असे अजित पवारांनी म्हटले.

## नाती तोडायला नव्हे जोडायला ताकद लागते...

आहोत. माझ्यावर तर पुत्री प्रेमाचा पण आरोप केला गेला, पण त्यात काही तथ्य नाही. सुप्रिया सुळे यांनी शिरुर मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आढळराव पाटलांना देखील टोला लगावला. सुळे पुढे म्हणाल्या की, आपले विरोधी उमेदवार म्हणत आहेत, ही माझी शेवटची निवडणूक आहे. मला निवडून द्या. अगं बया, मी तर घाबरलेच, असे म्हणत त्यांनी टोला लगावला. त्यांनी सांगितले की, म्हणजे पुढील पाच वर्षे काम करणार नाहीत. वर्ष मोजत राहतील.

## उद्धव ठाकरेंचे संतुलन बिघडले-फडणवीस

उद्धव ठाकरे यांचा तोल सुटलेला आहे. त्यांना वैद्यकीय उपचारांची आवश्यकता आहे. त्यांनी एखाद्या मानसोपचार तज्ज्ञांना दाखवावे. त्यांची मदत घ्यावी, असा पलटवार करत, मला असे वाटते की, या स्तराला जाऊन एखाद्या पक्षाचा प्रमुख बोलतो, त्यावेळी निश्चितपणे त्यांच्या लक्षात येते आहे की, जनतेने आपल्याला नाकारले आहे. म्हणूनच आता शिवीगाळ करण्यापर्यंत त्यांची पातळी खाली उतरलेली आहे. खरोखरच उद्धव ठाकरेंचे मानसिक संतुलन बिघडलेले आहे, अशी घणाघाती टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.

## आमचे अणुबॉम्ब कायम सज्ज असतात

अण्वस्त्रांनी सज्ज आहे. ते म्हणाले, ''विजय दिवस आपल्या पिढ्यांना एकत्र आणतो. आम्ही शतकानुशतके जुन्या परंपरांचा आदर ठेवत आहोत आणि आम्हाला विश्वास आहे की एकत्रितपणे आम्ही रशियाचे स्वतंत्र आणि सुरक्षित भविष्य सुनिश्चित करू. रशिया जागतिक संघर्ष रोखण्यासाठी सर्व काही करेल परंतु रशियाला उगाचच कोणीही डिवचू नये. आमचे सामरिक सैन्य नेहमीच युद्धासाठी तयार असते. रेड स्क्वेअरमधील कार्यक्रमात पुतिन यांनी त्यांची आण्विक ब्रीफकेस देखील धरली आणि तीन विशाल यार्स आण्विक क्षेपणास्त्र प्रक्षेपकांचे प्रात्यक्षिकही करण्यात आले.

## माजी नगरसेवक जावेद हसन खान यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- सर्वांच्या सुख दुःखात धावून जाणारे, मनमिळावू व्यक्तीमत्व लोटाकारंजा येथील रहीवासी माजी नगरसेवक जावेद हसन खान कासिम हसन खान (अंदाजे वय ६५) यांचे आज वृध्दापकाळाने निधन झाले. दोनदा त्यांनी विधानसभेची निवडणूक लढवली. दोनदा कॉंग्रेसचे नगरसेवक म्हणून निवडून आले. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी समाजकार्य केले. त्यांच्या निधनाने शहरात शोककळा पसरली. माजी नगरसेवक तकी हसन खान यांचे ते लहान भाऊ होते. निधनाची बातमी कळताच शिवसेनेचे नेते चंद्रकांत खैरे यांनी निवासस्थानी भेट देऊन सांत्वन केले. त्यांची नमाज-ए-जनाजा बाद नमाज असर शहागंज मस्जिदमध्ये अदा करण्यात आली. दफनविधी लोटा कारंजा येथील कब्रस्तानात करण्यात आला. अशी माहिती त्यांचा मुलगा राफेअ हसन खान यांनी दिली आहे. त्यांच्या पश्चात ४ भाऊ, पत्नी, एक मुलगा, ५ मुली नाती पोती असा मोठा परिवार आहे

## गोंदियाच्या सुर्यटोला जळीत कांडातील आरोपीला फाशीची शिक्षा

गोंदिया दि.९ (प्रतिनिधी)- गोंदियाच्या सुर्यटोला जळीत कांडातील आरोपी किशोर शेंडे याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. गोंदिया जिल्हा सत्र न्यायालयाने हा निकाल दिला. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेतलेल्या आरोपी किशोर शेंडे याने मध्यरात्री सासरा, पत्नी आणि मुलाला जिवंत जाळले होते. मागील वर्षी फेब्रुवारीमध्ये ही धक्कादायक घटना घडली होती. अशातच आता गोंदिया जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली आहे. गोंदिया जिल्हा सत्र न्यायायलयाने पहिल्यांदाच फाशीची शिक्षा सुनावल्याची घटना घडली आहे. गोंदिया शहराच्या सूर्याटोला भागात राहणारी महिला १४ फेब्रुवारी २०२३ माहेरी आली असताना तिच्या पतीने सासरी येत पत्नी तसेच ५ वर्षीय मुलगा आणि सासऱ्याच्या अंगावर पेट्रोल टाकून त्यांना जिवंत जाळले होते. त्यानंतर पोलिसानी आरोपीला काही तासातच अटक केली होती. अशातच आज गोंदिया जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपी किशोर शेंडे याला आज फाशीची शिक्षा सुनाविली आहे. सदर घटना १४ फेब्रुवारी २०२३ ला घडली होती. या प्रकरणी विविध सामाजिक संघटनांनी आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली होती. या संदर्भात कॅंडल मार्च देखील काढण्यात आला होता. हे प्रकरण गोंदिया जिल्हा सत्र न्यायालयात सुरू होते. अखेर या प्रकरणी आज ९ मे २०२४ ला गोंदिया जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली आहे. गोंदिया जिल्हा सत्र न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एन. बी. लवटे यांनी आरोपीला फाशीची शिक्षा सुनाविली आहे.